| | |
|---|---|
| MHST070028912024 | दाखल दिनांक : ०३/०७/२०२४<br>नोंदणी दिनांक : ०३/०७/२०२४<br>निकालाचा दिनांक : २२/०७/२०२५<br>कालावधी : ०१ वर्ष ०० म. १९ दि. |

**२ रे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कराड, ता.कराड, जि.सातारा यांचे न्यायालय**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती पी. एस. भोसले)**

**(घोषित दिनांक – २२/०७/२०२५)**

**नियमित फौजदारी खटला क्र. २३५/२०२४** **निशाणी क्र.**

**गु. क्र. ५१७/२०२४ दिनांक – ०२/०४/२०२४**

**कराड शहर पोलीस ठाणे, ता. कराड, जि. सातारा**

| | |
|---|---|
| **तक्रारकर्ता** | महाराष्ट्र शासनातर्फे,<br>कराड शहर पोलीस ठाणे,<br>ता. कराड, जि. सातारा.<br>**मुळ तक्रारकर्ता** – नरेंद्र वसंतराव जानुगडे.<br>वय ५० वर्षे. रा. प्लॉट नं.६४, शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड, ता.कराड, जि.सातारा. |
| **अभियोग पक्षातर्फे सहा सरकारी अभियोक्ता :** | श्री. एस.वाय.पाटील, सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी –** | १. रमेश महादेव कुंभार.<br>वय – ४३ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. प्लॅट नं.१०३, भव रेसीडेंन्सी कशेळी,<br>ता.भिवंडी, जि.ठाणे.<br><br>२. निलेश शामराव गाढवे.<br>वय – ४४ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. बनवडी, ता.कोरेगांव, जि.सातारा. |

| | |
|---|---|
| | ३. रफिक मेहबुब शेख.<br>वय – सज्ञान, व्यवसाय – –,<br>रा. बापूजी नगर, राबोडी, जि.ठाणे.<br><br>४. अंजूम इम्राईम शेख – **(फरार)**<br>वय – सज्ञान, व्यवसाय – –,<br>रा. पसारा, राबोडी, जि.ठाणे. |
| **आरोपी क्र.१ व ३ यांचेतर्फे विधीज्ञ :**<br><br>**आरोपी क्र.२ यांचेतर्फे विधीज्ञ :** | श्री.पी.के.पाटील. श्री.ए.एस.साठे<br><br>श्री.आर.यु.जगदाळे, |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची दिनांकः** | ३०/०३/२०२४ ते ०१/०४/२०२४ |
| **प्रथम खबर दिनांकः** | ०२/०४/२०२४ |
| **दोषारोपपत्राची दिनांकः** | ०३/०७/२०२४ |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांकः** | २१/०८/२०२४ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांकः** | ०४/०९/२०२४ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांकः** | निरंक |
| **न्यायनिर्णयाचा दिनांकः** | २२/०७/२०२५ |
| **शिक्षा दिल्याची तारीखः** | २२/०७/२०२५ |
| **आदेशः** | नमुद प्रमाणे |

| | |
|---|---|
| १) | आरोपी क्रं. १ व ३ नामे रमेश महादेव कुंभार व रफिक मेहबुब शेख यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(२) अन्वये भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३८०, ४५४, व ४५७ सह कलम ३४ अन्वये अपराधाकरीता दोषी धरण्यात येते व प्रत्येक कलमाच्या अपराधासाठी २ वर्षे प्रत्येकी सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येक कलमासाठी प्रत्येकी रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस प्रत्येकी १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे. |
| २) | आरोपी क्रं. २ – निलेश शामराव गाढवे यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४११ या अपराधासाठी दोषी धरण्यात येते व अपराधासाठी १ वर्षे सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा व रक्कम रुपये २,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १५ दिवस सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे. |
| ३) | वर नमुद शिक्षा आरोपींनी एकत्रितरित्या भोगावयाच्या आहेत. |

## आरोपींचा तपशील

| आरोपींची श्रेणी | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीन वर सोडल्या ची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान आरोपी कारागृहात असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रमेश महादेव कुंभार. | ०६.०४. २०२४ | | भारतीय दंड विधान कलम ४५४,३८०, ४५७, ४११ सह कलम ३४ अन्वये | दोषी | | दि.०६/०४ /२४ पासुन आजरोजी पर्यंत |
| २. | निलेश शामराव गाढवे. | ०६.०४. २०२४ | | | दोषी | | दि.०६/०४ /२४ पासुन आजरोजी पर्यंत |
| ३. | रफिक मेहबुब शेख. | २१.०६. २०२४ | | | दोषी | | दि.२१/०६ /२४ पासुन आजरोजी पर्यंत |
| ४. | अंजूम इम्राईम शेख – **(फरार)** | | | | आरोपी क्र.४ गुन्हा घडल्या पासून फरार असल्याने त्याचे विरुध्द खटला प्रलंबित ठेवण्यात आला. | | |

**भाग – क**

**अभियोग पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ.**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)अ.सा.क्र.१** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | नरेंद्र वसंत जानुगडे | फिर्यादी |
| सा.क्र.२ | रमेश उध्दवराव मोहीते | निवेदन पंच |
| सा.क्र.३ | मदन लक्ष्मण भोसले | घटनास्थळ पंच |
| सा.क्र.४ | विशाल शिवाजी पवार | निवेदन पंच |
| सा.क्र.५ | सदाशिव बळवंत खटावकर | छायाचित्रकार |
| सा.क्र.६ | शुभम बापू कांबळे | जप्ती पंच |
| सा.क्र.७ | महेश मारुती पवार | निवेदन पंच |
| सा.क्र.८ | रविंद्र शंकर पवार | ठाणे अंमलदार |
| सा.क्र.९ | उमा नरेंद्र जानुगडे | साक्षीदार |
| सा.क्र.१० | अर्चित नरेंद्र जानुगडे | साक्षीदार |
| सा.क्र.११ | महेश रमेश घोडके | सराफ |
| सा.क्र.१२ | विनोद वसंतराव जानुगडे | साक्षीदार |
| सा.क्र.१३ | दत्तासिंग मोतीसिंग गोरखा | साक्षीदार |
| सा.क्र.१४ | शंकर शामराव माने | निवेदन व जप्ती पंच |
| सा.क्र.१५ | धनाजी सर्जेराव देवकर | तपासी अंमलदार |
| सा.क्र.१६ | रोहित रमेश फारणे | साक्षीदार |
| सा.क्र.१७ | पृथ्वीराज योगीराज ताटे | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| **ब.** सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| **अनु. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| १. | नि.२० | फिर्याद |
| २. | नि.२१ | घटनास्थळाचा पंचनामा |
| ३. | आर्टी. ए१ ते ए६ | फोटोग्राफ्स |
| ४. | नि.२८ | आरोपी क्र.२ चा निवेदन व जप्ती पंचनामा |
| ५. | आर्टी. ब१ ते ब१३ | फोटोग्राफ्स |
| ६. | नि.३२ व नि.७३ | आरोपी क्र.१ चा निवेदन पंचनामा |
| ७. | आर्टी. सी१ ते सी४ | फोटोग्राफ्स |
| ८. | नि.३८ | ६५ब चे प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ९. | नि.३९ | मोबाईल जप्ती पंचनामा |
| १०. | आर्टी. बी १४ ते बी १५ | फोटोग्राफ्स |
| ११. | आर्टी. सी ५ ते सी ७ | फोटोग्राफ्स |
| १२. | आर्टी. डी १ ते डी २ | फोटोग्राफ्स |
| १३. | नि.४२ | ६५ब चे प्रमाणपत्र |
| १४. | नि.४५ | लेखी आदेश |
| १५. | नि.५४ | सोन्याची पावती |
| १६. | नि.५५ | सोन्याची पावती |
| १७. | नि.६० | दि.१४/०६/२०२४ रोजीचा मुद्देमाल परतीचा पंचनामा |
| १८. | नि.६२ व ६९ | आरोपी क्र.१ चा निवेदन व जप्ती पंचनामा |
| १९. | नि.६५ | मालमत्ता पत्रक |
| २०. | नि.६६ व नि.६७ | अटक पंचनामे |
| २१. | नि.६८, ७० व ७१, ७२, ७५, ७९ | मुद्देमाल पावत्या |
| २२. | नि.७४ | गाडीचा लॉगबुकचा उतारा |
| २३. | नि.७६ | आरोपी क्र.३ चा अटक पंचनामा |
| २४. | नि.७७ व नि.७८ | आरोपी क्र.३ चा निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा |
| २५. | आर्टी. ई १ ते ई ७ | फोटोग्राफ्स |
| २६. | नि.८० | ६५ब चे प्रमाणपत्र |
| २७. | नि.८१ | ६५ब चे प्रमाणपत्र |
| २८. | नि.८२ ते नि.१०० | स्टेशन डायरीवरील नोंदी |
| २९. | नि.११२ | आरोपी क्र.३ चा गु.र.नं. १५९२/२०२३ मधील निवेदन व जप्ती पंचनामा |

**बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायालयामार्फत निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | एम.आर.१३४/२४ | ३८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र |
| | | २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| | | १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुमके |
| | | ३४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे चैन |
| २. | एम.आर.१३५/२४ | ५० ग्रॅम वजनाचे सोन्याच्या दोन बांगडया |
| | | ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे हातातील गोठ |
| | | ५ ग्रॅम वजनाचे सोन्याची जोडवी |
| | | ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील रिंग |
| | | ६ ग्रॅम वजनाचे सोन्याची पेन |

| | | |
|---|---|---|
| | | १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिणी मंगळसुत्र |
| | | ११ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिणी मंगळसुत्र |
| | | ३.५०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| | | ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| | | ६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| | | ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| | | २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप |
| ३. | एम.आर.१३७/२४ | महिंद्र अॅण्ड महिंद्रा कंपनीची TUV 300 T4 + रजि.नं.एमएच ४६ बीए ४५१४ |
| ४. | एम.आर.७६/२४<br>फलटण ग्रा.पो. ठाणे<br>गु.र.क्र.१५९२/२०२३ | ३ तोळे वजनाचा चोकर, ३ पदरात मध्ये गोलाकार पेंडल व त्याचे खालील बाजुस घुंगराचे आकाराचे मणी |
| | | ५ तोळे वजनाचे दोन पाटल्या |
| | | ८ ग्रॅम वजनाच्या चार लेडीज अंगठया |
| | | ६ तोळे सोन्याचे घंटन मध्यभागी पेंडल |
| ५. | एम.आर.१६१/२४ | एक सोनेरी रंगाचा रिअलमी कंपनीचा रिअलमी सीएस ३ मोबाईल |
| | | एक काळया रंगाचा रेडमी कंपनीचा मोबाईल मॉडल २३१२४ आरएन 871 |
| ६. | एम.आर.२४४/२४ | १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी मंगळसुत्र |
| | | ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे एक कॉईन |
| | | २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन कॉईन |
| ७. | एम.आर.२४५/२४ | १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनीमंगळसुत्र |
| | | ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप्स |

| | | |
|---|---|---|
| | | ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील टॉप्स |
| | | १० ग्रॅम वजनाचे सोन्याची जोडवी |
| | | २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पैंजण |
| | | ३८ ग्रॅम वजनाचे सोन्याचा नेकलेस |

## न्या य नि र्ण य

(दि. २२/०७/२०२५ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा खटला आरोपी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८०, ४५७, ४११ सह कलम ३४ अन्वये अभियोग चालविण्यात आला आहे.

०२. **अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे** –

दि.३०/०३/२०२४ रोजी मौजे कराड, ता.कराड हद्दीतील शिवाजीनगर हौसिंग सोसायटी येथे सकाळी ०६.०० ते दि.०१/०४/२०२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा. चे सुमारास सदरचा अपराध घडला. फिर्यादीचा मुलगा अर्चीत हा नोकरीनिमित्त बेंग्लोर येथे राहणेस होता, त्याचा बेंग्लोर येथे अपघात झालेने फिर्यादी व त्यांची पत्नी दि.३०/०३/२०२४ रोजी सकाळी ६.०० वा. चे सुमारास राहता बंगला लॉक करुन, बेंग्लोरला गेले होते. दि. ०१/०४/२०२४ रोजी सायंकाळी ६.३० चे सुमारास त्यांना त्यांचा चालक दत्तासिंग यांचा फोन आला व त्याने सांगितले की, बंगल्याचा मुख्य दरवाजा उघडा दिसत आहे. तसेच शेजारील खिडकीचे दोन गज कापलेले आहेत. त्यामुळे फिर्यादीने त्यांचा भाऊ विनोद याला फोन करुन, घरात जावुन पाहण्यास सांगितले असता, फिर्यादीच्या भावाने पाहणी करुन घरातील बेडरुमचे दरवाजे उघडे आहेत व घरात चोरी झाल्याचे सांगितले. दि.०२/०४/२०२४ रोजी पहाटे ३.३० वा. चे सुमारास फिर्यादी, त्यांची पत्नी व मुलगा राहते घरी आले. त्यांनी घरात जाऊन पाहीले असता, त्यांचे घराचा मुख्य दरवाजा कटावणीच्या सहाय्याने उघडण्याचा प्रयत्न केला होता, दरवाजा शेजारील खिडकी उचकटुन दोन गज कापुन कोणीतरी घरात प्रवेश करुन बेडरुमचा दरवाजा तोडुन बेडरुममधील वॉर्डरोब मधील ड्रॉव्हरमधील सोन्याचे, हि–याचे व चांदीचे एकुण ३७,९४,०००/– चे दागिणे व महत्वाचे कागदपत्र, वरच्या हॉलमधील वायफायचा राऊटर असे चोरुन नेल्याचे दिसले. म्हणून फिर्यादीने कराड शहर पोलीस ठाणे येथे

तक्रार दिली.

०३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा क्र. ५१७/२०२४ दाखल करण्यात आला व आरोपी क्र.१ ते ३ विरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८०, ४५७, ४११ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास तपासी अंमलदार श्री.डी.एस.देवकर यांच्याकडे सोपविण्यात आला. सदर तपासादरम्यान त्यांनी जप्ती व मेमोरंडम तसेच घटनास्थळ पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपी क्र.१ ते ३ याचेविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४५४, ३८०, ४५७, ४११ सह कलम ३४ अन्वये नि.क्र.१० वर दोषारोप नोंदवून प्रकरण पुढे चालविण्यात आले. आरोपींना सदर दोषारोप वाचुन दाखविले असता, त्यांनी गुन्हा नाकबुल केला व संपरीक्षेची मागणी केली. अभिलेखावर आरोपींविरुद्ध पुरावा उपलब्ध झाल्याने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ (१)(ब) अन्वये नि.क्र.११३, ११४ व ११९ वर आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीचा संपुर्ण बचाव नकारात्मक असुन, खोटया गुन्हयात गोवले असा आहे. आरोपी क्र.४ हे सदर गुन्हा घडलेपासुन फरार आहेत.

०५. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.वाय.पाटील यांचा व आरोपी क्र.१ व ३ तर्फे श्री.पी.के.पाटील यांचा युक्तिवाद ऐकला व आरोपी क्र. २ तर्फे श्री.आर.यु.जगदाळे यांनी लेखी युक्तिवाद दाखल केला.

०६. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे दिलेली आहे.

| *__मुद्दे__* | *__निष्कर्ष__* |
|---|---|
| १) अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ३०/०३/२०२४ रोजी सकाळी ६.०० वा. ते दि.०१/०४/२०२४ रोजी सायंकाळी ६.०० वा.चे सुमारास शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड, | .. होकारार्थी |

ता.कराड, चे हद्दीत आरोपी यांनी आपसात संगनमत करुन, फिर्यादीचे राहते बंगल्याचा मुख्य दरवाजा उचकटण्याचा प्रयत्न करुन दरवाजाच्या शेजारील खिडकी उचकटून दोन गज कापून घरात चोरटे गृहअतिक्रमण केले व त्यामुळे भा.दं.वि. कलम ४५४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ?

२) अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त ठिकाणी, वेळी व दिवशी आरोपींनी आपसात संगनमताने फिर्यादीच्या घरात प्रवेश करुन बेडरुमचा दरवाजा तोडून बेडरुम मधील वॉर्डरोब मधील कपाटाचे ड्रॉव्हर मधील सोन्याचे, हि–याचे, चांदीचे एकुण रु.३७,९४,०००/– किंमतीचे दागिणे, महत्वाची कागदपत्रे व वायफायचा राऊटर असा मुद्देमाल स्वतःचे फायदयाकरीता फिर्यादीच्या संम्मतीशिवाय चोरुन नेला व त्यामुळे भा.दं.वि. कलम ३८० सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? .. होकारार्थी

३) अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळी, ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमताने रात्रीच्या वेळी चोरटे गृहअतिक्रमण केले व बेडरुमचा दरवाजा तोडून बेडरुम मधील वॉर्डरोब मधील कपाटाचे ड्रॉव्हर मधील सोन्याचे, हि–याचे, चांदीचे एकुण रु.३७,९४,०००/– किंमतीचे दागिणे, महत्वाची कागदपत्रे व वायफायचा राऊटर असा मुद्देमालाची चोरी केली व त्यामुळे भा.दं.वि. कलम ४५७ सह ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? .. होकारार्थी

| | | |
|---|---|---|
| ४) | वरील तारीख, वेळी, ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमताने सदरची मालमत्ता ही चोरीची आहे, हे माहित असतांना आरोपी क्र.२ यांनी ती आरोपी क्र.१ यांचेकडून स्विकारली व त्यामुळे आरोपी क्र.२ यांनी भा.दं.वि. कलम ४११ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | .. होकारार्थी |
| ५) | काय आदेश ? | आरोपी क्र.१ व ३ यांना भा.द.वि.कलम ३८०, ४५४, ४५७ सह कलम ३४ व आरोपी क्र.२ यांस भा.द.वि.कलम ४११ अन्वये दोषी ठरविण्यात येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता</u> :–**

मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने एकत्रित विचारात घेण्यात आले.

०७. आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेकामी सरकार पक्षातर्फे **नरेंद्र वसंतराव जानुगडे (सा.क्र.१)** यांना नि.१९ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले की, त्यांचे घरी ते व त्यांची पत्नी असे राहतात, त्यांचा मुलगा बेंग्लोर येथे घटनेच्या वेळी नोकरी करत होता. दि.३०/०३/२०२४ रोजी ते व त्यांची पत्नी सकाळी ६ वा.चे सुमारास त्यांच्या मुलाचा अॅक्सीडेंट झाला होता, म्हणून बेंग्लोर येथे घर बंद करुन गेले होते, घरी कोणी नव्हते. दि.०१/०४/२०२४ रोजी त्यांच्या मुलाला हॉस्पीटलमधून डिस्चार्ज दिल्यानंतर त्यांचे मुलाला कराड येथे घेवुन येण्यासाठी त्यांचा चालक दत्तासिंग गोरखा याला त्यांनी फोन करुन गाडी घेवुन पुणे विमानतळावर येण्यासाठी सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा चालक

दि.०१/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ६ वाजताचे दरम्यान घरी आला असता, त्याला मुख्य दरवाजा उघडा दिसला. मुख्य दरवाजाचे शेजारी असलेले खिडकीचे दोन गज खाली कापून टाकलेले होते. त्याने त्यांना लगेच फोन करुन दरवाजा उघडा असल्याचे व खिडकीचे गज कापल्याचे सांगितले. त्यांचा भाऊ विनोद जानुगडे हा त्यांचे शेजारी राहतो, त्यांनी त्यांना फोन करुन घरात काय झाले, ते बघायला सांगितले. त्यांच्या भावाने घरात पाहणी केल्यानंतर चोरी झाल्याचे दिसत आहे, असे सांगितले. त्यांनी त्यांचे भावाला पोलिसांना फोन करुन बोलावून घेण्यास सांगितले. ते दि.०२/०४/२०२४ रोजी पहाटे तीन ते साडे तीनच्या वाजताचे सुमारास कराडला आले. घरी आल्यावर त्यांना खिडकीचे गज कापल्याचे दिसून आले. मुख्य दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला होता. बेडरुमचा दरवाजा तोडलेला होता. बेडरुममधील कपाटाचे लॉक व कपाटातील दोन ड्रॉव्हरचे लॉक तोडलेले होते. त्यातुन सोन्याचे व हि-याचे दागिणे, चांदीचे ताट, वाटया, ग्लास व भांडी असे एकुण ३८,००,०००/- लाखाचे दागिणे, या व्यतिरिक्त होमथिएटरमधील एअरटेलचा राऊटर, महत्वाचे कागदपत्र, पत्नीचे पॅनकार्ड, बॅक ऑफ बडोदाचे एटीएम, हि-याच्या दागिण्यांचे वॅल्युऐशन सर्टीफिकेट तसेच इतर महत्वाचे कागद सुध्दा चोरीस गेले होते.

०८. त्याप्रमाणे दि.०२/०४/२०२४ रोजी त्यांनी पोलिस स्टेशन येथे अज्ञात इसमांविरुध्द फिर्याद दिली. दि.०३/०४/२०२४ रोजी पोलिसांनी घरी येवुन घटनास्थळाचा पंचनामा केला. दि.०३/०४/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांचेकडे घटनेबाबत चौकशी केली होती. फिर्याद देतेवेळी गडबडीत चोरीस गेलेल्या दागिण्यांची माहिती चुकीची लिहीली होती. त्यामुळे सदर माहिती त्यांनी पोलिसांना दुरुस्त करुन दिली होती. त्याबाबत पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. त्यांना आरोपीची नावे रमेश कुंभार, रफिक शेख, अंजुम शेख यांना मदत करणारे निलेश गाढवे अशी असल्याचे पोलिसांकडून समजले. चोरीला गेलेल्या दागिण्यांपैकी त्यांना साडे बावीस तोळे सोन्याचे दागिणे न्यायालयाच्या आदेशाने परत मिळाले आहेत व त्यांनी ११ ते १३ तोळे सोने परत मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी न्यायालयात दागिणे परत मागतांना दागिण्यांच्या पावत्या दाखल केल्या होत्या, असे नमुद केले आहे.

०९. सदर साक्षीदाराचा आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास घेण्यात आला. उलटतपासामध्ये त्यांनी आरोपीबाबत त्यांना पोलिसांनी सांगितले होते तसेच चोरी

झाल्याबाबतचा फोन त्यांच्या चालकाने त्यांना १ तारखेला केल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने ते बेंग्लोर येथे असल्यामुळे व वेळ न मिळाल्यामुळे दि.०१/०४/२०२४ रोजी ऑनलाईन फिर्याद दिली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच चोरी किती वाजता झाली, कोणी केली याबाबत त्यांना ते बेंग्लोर येथे असल्यामुळे माहिती नव्हते. त्यांना पोलिसांनी सांगितल्यामुळे आरोपींची नावे सांगत असल्याचे त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने आरोपी क्र.१ व ३ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी फिर्याद देतेवेळी दागिण्यांचे वर्णन सांगितले नसून दागिण्यांच्या पावत्या पोलिसांना दिल्या नव्हत्या. त्यांनी फिर्याद दिली त्याच्या दुस-या दिवशी ते पोलिस स्टेशन येथे गेले होते व पोलिसांनी त्यांचे तपासटिपण नोंदविले. तसेच त्यांचे जप्त केलेले दागिणे पोलिसांनी त्यांना पोलिस स्टेशन येथे दाखवून ओळखण्यास दिले होते, हे मान्य केले आहे.

१०. सरकार पक्षातर्फे **रमेश उध्दवराव मोहिते (सा.क्र.२)** यांना नि.२७ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०८/०४/२०२४ रोजी ते कराड तालुका पोलीस स्टेशन येथे १२ ते १२.३० चे दरम्यान कामानिमित्त गेले होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना आरोपीचे निवेदन नोंदवायचे असून, पंच म्हणून हजर राहण्याची विचारणा केल्यामुळे ते पंच म्हणून हजर राहिले. आरोपी निलेश याने निवेदन दिले की, त्याचा मित्र रमेश कुंभार याने चोरी केलेले सोने त्यांचेकडे ठेवले आहे. निलेश याने सदरचे सोने त्याच्या गावी शेडमध्ये ठेवले होते ते काढून देतो असे निवेदन दिले. त्याप्रमाणे खाजगी गाडीतून ते, त्यांचा मित्र, पोलिस व आरोपी बनवडी कोरेगाव येथे गेले. तेथे पश्चिम बाजुला एक शेड व घर होते. ते घर व शेड आरोपी निलेश यांचे होते. आरोपीने गाईच्या गोठयात दोन्ही पत्रांच्या मध्ये बोट करुन व तेथे सोने ठेवले आहे, असे सांगितले व हात घालुन सोने काढून दिले.

११. सदर साक्षीदाराने त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, सोने कापडामध्ये गुंडाळलेले होते. सदरच्या दागिण्यांमध्ये एक मंगळसूत्र, कानातले टॉप्स व झुमके व एक चेन होती. पोलिसांनी त्याचा पंचनामा केला व तेथे सोनाराला बोलावून दागिण्यांचे वजन केले व जप्ती पंचनामा केला. सदर साक्षीदाराने आरोपी क्र.१ ते ३ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये कोणाची चोरी झाली होती, याबाबत त्यांना माहिती नाही. ते फिर्यादीस ओळखत नाहीत. आरोपीचे निवेदन नोंदविले त्यावेळी ते, दूसरा पंच, आरोपी व देवकर हजर होते. आरोपीने निवेदन देतांना मुद्देमाल पत्राचे शेड

मध्ये नेवुन ठेवला होता, असे सांगितले होते. आरोपीच्या निवेदनाप्रमाणे ते घटनास्थळावर गेले. सदरचे घटनास्थळ बंदिस्त नसून तेथे कोणीही राहण्यास नव्हते, हे मान्य केले आहे.

१२. सरकार पक्षातर्फे **मदन लक्ष्मण भोसले (सा.क्र.३**) यांना नि.२९ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०३/०४/२०२४ रोजी पोलीसांनी त्यांना शिवाजी हौसिंग सोसायटी येथे बोलाविले होते. त्यावेळी त्यांचेसोबत दूसरे पंच विजय शिंदे हजर होते. ते फिर्यादीच्या घरी ४ ते ४.३० चे सुमारास गेले. फिर्यादीच्या घरी चोरी झाली होती, त्यामुळे पोलिसांना घटनास्थळाचा पंचनामा करायचा होता. त्यावेळी फिर्यादी, दूसरा पंच व पोलिस स्टाफ घटनास्थळी हजर होते. फिर्यादी यांचे घर प्लॉट नं.६४ मध्ये असून त्यांच्या बंगल्याचे नाव अर्चित होते. सदरचे घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले होते. मुख्य गेटमधून आतमध्ये गेल्यावर उत्तरेला मुख्य दरवाजा होता व त्याच्या शेजारी असलेली खिडकी पुर्वेला तोंड करुन होती, तिचे खालचे दोन गज कापलेले होते व गज आडवे होते. मुख्य दरवाज्याला कटावणीच्या खुणा पडलेल्या होत्या. त्यानंतर ते मुख्य दरवाजातून आतमध्ये गेले असता. हॉलमध्ये जिना होता. जिन्यातुन वर उजव्या साईडला फिर्यादी यांची बेडरुम होती. बेडरुमच्या आतमधील कपाटाचा दरवाजा मोडलेला होता. तेथे एक कपाट होते व त्याचा दरवाजा कटावणीने मोडलेला होता. बेडरुमचा दरवाजा कटावणीने उचकटला होता. ड्रॉव्हर मधील कपडे विस्कटलेले होते. बेडरुम मधील कपाटातुन सोने, महत्वाचे कागदपत्र व क्रेडीट कार्डस चोरीस गेले होते. काय काय चोरीस गेले होते ते फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे फिर्यादीत नमुद केले. त्यानंतर बेडरुम मधून बाहेर आल्यावर समोर असलेल्या रुममधील वायफायचे राऊटर चोरीला गेले होते. सदरचा पंचनामा बरोबर असल्याचे त्याचे कथन आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, घटनास्थळाच्या खालच्या मजल्यावर कोणतीही मोडतोड झाली नव्हती. काय चोरीस गेले होते, याबाबत त्यांना वैयक्तिक माहिती नाही.

१३. सरकार पक्षातर्फे **विशाल शिवाजी पवार (सा.क्र.४)** यांना नि.३१ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, ते रिक्षाचालक आहेत. दि.१४/०४/२०२४ रोजी ते त्यांच्या मित्राच्या पासपोर्टच्या कामानिमित्त पोलिस स्टेशन येथे गेले होते. सकाळी १० ते १०.३० चे सुमारास पोलिस स्टेशन

येथे गेलो असता, आरोपी निवेदन देणार आहे, त्यासाठी पंच म्हणून हजर राहण्यास त्यांना पोलिसांनी विचारणा केली. त्यावेळी आरोपी रमेश कुंभार पोलिस स्टेशन येथे होता. आरोपीने कुठे, कुठे घरफोडी केली आहे, ते दाखवितो, सोबत चला असे निवेदन दिले. आरोपीने शेख नावाच्या इसमांसोबत घरफोडी केल्याचे सांगितले. पोलिसांनी सदरचे निवेदन आरोपीच्या सांगणेप्रमाणे लिहून घेतले होते. त्यानंतर ते शासकिय वाहनाने आरोपी, ते, दूसरा पंच व सोनार एकुण तीन पोलिस असे आरोपीच्या सांगणेनुसार शिवाजीनगर हौसिंग सोसायटीकडे गेलो. तेथे गेल्यावर एका बंगल्याकडे बोट दाखवून गाडी थांबविण्यास सांगितली. तेथे गेल्यानंतर पोलिसांनी पंचनामा लिहीण्यास सुरुवात केली. त्यातील एक पोलिस कर्मचा–याने ठिकाणाचे व पंचनामा करतानाचे फोटो काढले.

१४. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर आरोपीने फलटण दिशेने गाडी घेण्यास सांगितली. फलटण येथे गेल्यानंतर आरोपीने तीन ठिकाणे दाखविली. आरोपीने फलटणपासून ७ ते ८ किमी अंतरावर गाडी थांबविण्यास सांगितली व तेथे एक घर दाखविले. त्यानंतर आरोपीने वागवणे यांचे घर दाखविले. ५ ते ६ किमी अंतरावर दूसरे घर दाखविले. शेवटचे ठिकाणापर्यंत जाईपर्यंत रात्रीचे ८ ते ८.३० झाले होते. त्यानंतर पोलिसांनी निवेदन पंचनामा पूर्ण केला. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, पोलिसांनी अर्चित बंगला येथे जे जे पाहिले त्याचा पंचनामा केला, त्यानंतर ते फलटण येथे ३ ठिकाणी गेले, तेथे ३ वेगवेगळे पंचनामे केले. आरोपीने त्याचे समक्ष निवेदन दिले होते. निवेदनाप्रमाणे घटनास्थळावर जावुन पंचनामा केला.

१५. सरकार पक्षातर्फे **सदाशिव बळवंत खटावकर (सा.क्र.५)** यांना नि.३७ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०३/०४/२०२४ रोजी त्यांना पीएसआय धनाजी देवकर यांनी कराड शहर पोलिस स्टेशन येथे घटनास्थळ पंचनाम्याचे फोटो काढणेसाठी बोलाविले होते. ते श्री.देवकर, दोन पंच शिवाजी स्टेडियमच्या जवळ शिवाजी हौसिंग सोसायटी येथे गेले. सदरचे घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. त्यांनी सोनी अल्फा ६०० या डिजीटल कॅमेरामध्ये घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर एकुण १५ फोटो काढले. ते डेव्हलप करुन त्यांनी श्री.देवकर यांना दिले. त्याबाबतचे ६५ब चे प्रमाणपत्र तपासी अंमलदार यांना दिले. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, सदरचे

घटनास्थळ हे शिवाजी स्टेडियमच्या समोर होते. त्यांच्या कॅमेरामध्ये फोटो वर तारीख वेळ नमुद करता येते. त्यांनी काढलेले फोटोग्राफ्स मेमरी कार्डमध्ये सेव्ह होतात व मेमरी कार्डमधून ते डेव्हलप केले जातात.

१६. सरकार पक्षातर्फे **शुभम बापू कांबळे (सा.क्र.६)** यांना नि.३९ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.१५/०४/२०२४ रोजी त्यांना पोलिसांनी कराड शहर पोलिस स्टेशन येथे ५.०० वा. चे सुमारास बोलाविले होते. ते पोलिस स्टेशन गेले त्यावेळी तेथे दूसरा पंच करण दरागडे, पोलिस व रेश्मा कुंभार हजर होत्या. त्यावेळी रेश्मा कुंभार यांनी दोन मोबाईल पोलिसांना दिले. त्यातील एक सोनेरी रंगाचा व एक काळया रंगाचा होता. सदरचे मोबाईल त्यांचेसमक्ष जप्त करुन, जप्ती पंचनामा केला. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, पोलिसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर त्यांनी वाचून सहया केल्या व पोलिसांनी त्यांचेसमक्ष मोबाईल जप्त केले.

१७. सरकार पक्षातर्फे **महेश मारुती पवार (सा.क्र.७)** यांना नि.४१ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०८/०४/२०२४ रोजी त्यांना पीएसआय देवकर यांनी कराड शहर पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र.५१७/२०२४ या गुन्हयाचा मेमोरेंडम पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. आरोपी निलेश गाढवे याने पोलिस स्टेशनमध्ये असतांना निवेदन दिले की, ज्या ठिकाणी मुद्देमाल ठेवला आहे तो काढून देतो. आरोपीने सांगितल्याप्रमाणे ते बनवडी ता, कोरेगाव येथे गावात एक पत्राचे शेडमध्ये गेले. आरोपीने तेथून सोन्याचे दागिणे भिंतीजवळील पोत्यातून काढून दिले. दूसरे दिवशी आरोपी रमेश कुंभार याचेसोबत भिवंडी, ठाणे येथे जावुन, गुन्हयात वापरलेली गाडी त्याने रस्त्याच्या कडेला लावली होती, ती काढून दिली. त्यानंतर आरोपीच्या सांगण्यानुसार त्याचे घरी गेल्यानंतर त्याने त्याचे घरात लपवून ठेवलेले सोने काढून दिले.

१८. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर आरोपी रमेश कुंभार हा त्याच्या मित्राकडे घेवुन गेला. आरोपीने त्याच्या मित्रामार्फत सोने सोनाराला विकले होते. ज्यास सोने विकले होते, अंधेरी येथे जावुन सोनाराकडून सोने जप्त करुन त्याचे फोटो काढले. त्यानंतर दि.१४/०४/२०२४ रोजी पीएसआय देवकर यांनी बोलाविले होते. रमेश कुंभार याने सांगितल्याप्रमाणे ते

जिंती फलटण येथे गेले. त्याने चोरी केल्याचे ठिकाण दाखविले. तेथे घटनास्थळाचे फोटो काढले. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, फोटोवर तारीख, वेळ नमुद नाही. सदरचे फोटो डेव्हलप करण्यासाठी मोबाईल त्यांनी फोटोग्राफरला दिला होता. त्यांनी सदरचा मोबाईल तपासकामी तपासी अधिकारी यांना दिला नव्हता.

१९. सरकार पक्षातर्फे **रविंद्र शंकरराव पवार (सा.क्र.८)** यांना नि.४४ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०२/०४/२०२४ रोजी ते कराड शहर पोलिस स्टेशन येथे ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होते. दि.०२/०४/२०२४ रोजी फिर्यादी हयांचे घरामध्ये दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ या कालावधीत अज्ञात इसमाने घरात प्रवेश करुन सोन्याचे, चांदीचे व हि-याचे दागिणे तसेच इतर कागदपत्र, वायफायचा राऊटर असे चोरुन नेल्याची तक्रार दिली होती. त्यांनी सदरची तक्रार नोंदवून घेतली व पुढील तपास पीएसआय देवकर यांचेकडे दिला. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, फिर्याद देतेवेळी चोरीस गेलेल्या दागिण्यांच्या पावत्या दिल्या नव्हत्या.

२०. सरकार पक्षातर्फे **उमा नरेंद्र जानुगडे (सा.क्र.९)** यांना नि.४८ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, त्यांचे पती गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर असून, मुलगा अर्चित हा बेंग्लोर येथे नोकरी करत होता. दि.०४/०४/२०२४ रोजी त्या पोलिस स्टेशन येथे त्यांचे घरी चोरी झाली म्हणून गेल्या होत्या. दि.३०/०३/२०२४ रोजी त्यांच्या मुलाचा अपघात झाला होता म्हणून त्या व त्यांचे पती कराड येथून बेंग्लोर येथे गेले होते. ते दोन दिवस तेथेच राहिले. दि.०१/०४/२०२४ रोजी त्यांनी त्यांचा चालक दत्तासिंग याला ते बेंग्लोर येथून निघून पुणे येथे येणार असल्याचा फोन केला. त्यावेळी तो गाडी घेण्यासाठी त्यांचे घरी गेला असता, तो लॉक उघडून आतमध्ये आल्यावर त्याला त्याच्या घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. त्यांनी त्यांना फोन करुन चोरी झाल्याचे सांगितले. त्यांचे दिरांना फोन करुन त्यांचे पतीने घरी जाणेस सांगितले.

२१. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, दि.०२/०४/२०२४ रोजी पहाटे ते त्यांचे घरी कराड येथे पोहोचले. त्यावेळी त्यांच्या

घराचा मुख्य दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला होता, शेजारील खिडकीचे दोन गज तोडलेले होते. घरातील वस्तु अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. मास्टर बेडरुमचा दरवाजा तोडून त्यातून आत प्रवेश केला होता. वॉर्डरोबचे लॉक तसेच ड्रॉव्हरचे लॉक तोडून त्यातील सोने, चांदीचे व डायमंडचे दागिणे असे एकुण मिळुन सोन्याचे ६५ तोळे, हि-याचे पंचवीस लाखाचे व चांदीचे ३ ते ४ किलोचे दागिणे तसेच वायफाय राऊटर व घरातील कागदपत्रे चोरीस गेले होते. त्यांनतर त्या, त्यांचे पती व मुलगा असे कराड शहर पोलिस स्टेशन येथे जावुन, त्यांचे पतीने घटनेची फिर्याद दिली. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला होता. दि.३०/०६/२०२४ रोजी पोलिसांनी पुन्हा त्यांना कराड शहर पोलिस स्टेशन येथे त्यांचे दागिणे मिळाले होते ते दाखविण्यासाठी बोलाविले होते. पहील्यावेळी त्यांना २० तोळे सोने व दुस-यांदा ११ तोळे परत मिळाले. त्या अनुषंगाने पोलिसांनी त्यांचा पुरवणी जबाब नोंदविला. सदर साक्षीदाराने पोलिस स्टेशन येथे जबाब देतेवेळी त्यांचे कोणते दागिणे चोरीला गेले होते, त्याचे वर्णन पोलिसांना सांगितले होते व ते पोलिसांनी लिहून घेतल्याचे उलटतपासामध्ये मान्य केले आहे.

२२. सरकार पक्षातर्फे **अर्चित नरेंद्र जानुगडे (सा.क्र.१०)** यांना नि.५१ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, त्यांचे वडील गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर असून ते स्वतः बेंग्लोर येथे नोकरी करत होते. दि.३०/०३/२०२४ रोजी रात्री त्यांचा अपघात झाला होता. त्यावेळी पहाटे त्यांच्या मित्राने सदरची घटना फोन करुन त्यांचे घरी सांगितली होती. त्यामुळे त्यांचे आईवडिल दि.३१/०३/२०२४ रोजी बेंग्लोर येथे आले होते. त्यांचेवर दोन दिवस उपचार सुरु होते. दि.०१/०४/२०२४ रोजी त्यांचा चालक दत्तासिंग याला त्यांना पुणे विमानतळावर घ्यायला या असे सांगितले. त्यानंतर त्यांचा चालक दत्तासिंग हे त्यांच्या कराड येथील घरी गेले. त्यावेळी त्यांना त्यांच्या घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. त्यामुळे त्यांनी त्यांचे वडीलांना फोन केला व घराचा दरवाजा उघडा दिसल्याचे सांगितले. त्यांचे वडिलांनी त्यांचे चुलते यांना फोन केला. त्यावेळी त्यांचे चुलते तेथे गेले व त्यांनी घराचा मुख्य दरवाजा उघडा असून, बाजुच्या खिडकीचे गज कापलेले आहेत, असे सांगितले. त्यानंतर दि.०२/०४/२०२४ रोजी पहाटे ते त्यांचे घरी कराड येथे पोहोचले. त्यावेळी मास्टर बेडरुमचा दरवाजा तोडलेला होता. वॉर्डरोबचे लॉक तसेच ड्रॉव्हरचे लॉक तोडून त्यातील सोने, चांदीचे व डायमंडचे दागिणे तसेच वायफाय राऊटर व घरातील कागदपत्रे चोरीस गेले होते. त्यानंतर त्यांचे वडिलांनी पोलिस

स्टेशन येथे जावुन फिर्याद दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये अमान्य केले आहे की, नेमके कोणते दागिणे चोरीला गेले होते. याबाबत त्यांना वैयक्तिक माहिती नाही.

२३. सरकार पक्षातर्फे **महेश रमेश घोडके (सा.क्र.११)** यांना नि.५३ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, त्यांचा सोनार काम व सराफी व्यवसाय आहे. दि.०८/०४/२०२४ रोजी त्यांना श्री. देवकर यांचा फोन आला होता. त्यांनी एक आरोपी पकडलेला आहे, त्याचेकडून सोने जप्त करायचे आहे, ते खरं आहे की खोटे आहे याची शहानिशा करणेसाठी त्यांना फोन केला होता. त्यानुसार ते दुपारी अडीच वा.चे सुमारास वाढे फाटा सातारा येथे गेले. त्यानंतर श्री. देवकर व आरोपी हे वाढे फाटा येथे आले, ते त्यांचेसोबत बनवडी, ता.कोरेगांव येथे गेले. तेथे आरोपींनी शेडमध्ये सोने ठेवलेले काढून दिले. त्यानंतर ते सोने असल्याची त्यांनी खात्री केली त्याप्रमाणे त्यांनी सदर सोन्याचे वजन केले. ते अंदाजे ८६ ग्रॅमचे होते. त्याप्रमाणे सदर सोन्याची पावती करुन श्री. देवकर यांना दिली.

२४. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, दि.०९/०४/२०२४ रोजी त्यांना पुन्हा श्री. देवकर यांचा फोन आला. त्यांनी त्यांना बॉम्बे रेस्टॉरंट चौक सातारा येथे बोलाविले. तेथून ते, श्री. देवकर यांचेसोबत आरोपी कुंभार याच्या घरी ठाणे कशेळी येथे गेले. सदरचे घर फ्लॅटमध्ये होते. आरोपी कुंभार याने कपाटात ठेवलेले दागिणे काढून दिले. सदर दागिणे सोन्याचे असल्याबाबत त्यांनी खात्री केली. ते १३९.५०० ग्रॅम होते. त्याप्रमाणे सदर सोन्याची पावती करुन श्री. देवकर यांना दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये सदर पावतीमध्ये सोन्याचे वजन, किंमत व सोने किती कॅरेटचे होते, याबाबतचा उल्लेख नसल्याचे मान्य केले आहे. तसेच दि.०९/०४/२०२४ रोजीच्या पावतीमध्ये सुध्दा सोन्याचे वजन, किंमत व कॅरेट नमुद नसल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराने फिर्यादी यांच्या सांगणेवरुन बनावट पावत्या दिल्याचे नाकारले आहे.

२५. सरकार पक्षातर्फे **विनोद वसंतराव जानुगडे (सा.क्र.१२)** यांना नि.५७ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, फिर्यादी त्यांचा धाकटा भाऊ आहे. दि.३०/०३/२०२४ रोजी नरेंद्र जानुगडे हे त्यांचे पत्नीसोबत त्यांच्या मुलाचा अपघात झाला होता, त्यामुळे बेंग्लोर येथे गेले होते.

दि.०१/०४/२०२४ रोजी त्यांना त्यांचे धाकटे भावाचा फोन आला व त्याने सांगितले की, त्याचा चालक दत्तासिंग हा गाडीची चावी घेण्यासाठी घरी आला आहे, त्याला घराचा दरवाजा उघडा दिसत असल्याचे चालकाने त्याला फोन केला आहे. तेव्हा घरी जावुन खात्री करण्यास सांगितले. तेव्हा ते घरी गेले असता, घराचा मुख्य दरवाजा उघडा होता. सदरचा दरवाजा कटावणीने उचकटला होता. तसेच खिडकीचे लोखंडाचे गज कापलेले होते. त्यांनी बेडरुमपर्यंत पाहणी केली असता, तेथे सर्व अस्ताव्यस्त पडलेले होते.

२६. सदर साक्षीदाराने त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी त्यांचे भावाला फोन करुन सदयस्थिती कळविली. त्यांचा भाऊ दि.०२/०४/२०२४ रोजी पहाटे कराड येथे आले. त्यांच्या भावाने घरी आल्यानंतर पाहणी केली असता, त्यांना सोन्याचे, हि–याचे दागिणे, तसेच घरातील वायफायचा राऊटर व कागदपत्र चोरीस गेल्याचे समजले. त्यामुळे त्यांनी घटनेची फिर्याद दिली. आरोपींची नावे रमेश कुंभार, रफिक शेख, अंजुम शेख व गाढवे अशी असल्याचे त्यांना नंतर समजले होते. चोरीस गेलेल्या दागिण्यांपैकी काही दागिणे पोलिसांनी आरोपींकडून जप्त केले. आरोपीची नावे निष्पन्न झाल्यानंतर व काही दागिने जप्त केल्यानंतर त्याचा पुन्हा जबाब नोंदविला होता. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांच्या भावाचा त्यांना संध्याकाळी ६.३० चे सुमारास फोन आला तेव्हा ते भावाच्या घरी गेले होते, तेथे ते जाण्यापुर्वी चालक हजर होता व त्यांनी फोन केल्यावर पोलिस घटनास्थळावर आले होते.

२७. सरकार पक्षातर्फे **दत्तासिंग मोतीसिंग गोरखा (सा.क्र.१३)** यांना नि.५९ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, ते सन २०१६ पासुन फिर्यादी यांच्याकडे चालक म्हणून काम करतात. दि.३०/०३/२०२४ रोजी त्यांना फिर्यादी यांचा फोन आला होता व त्यांनी मुलाचा अपघात झालेला आहे, त्यांना पुणे एअरपोर्ट येथे सोडायचे आहे असे सांगितले. दि.३०/०३/२०२४ रोजी सकाळी ६.०० वा. फिर्यादी व त्यांचे पत्नीला त्यांनी पुणे एअरपोर्ट येथे सोडले व ते पुन्हा त्याच दिवशी कराड येथे आले. दि.०१/०४/२०२४ रोजी दुपारी त्यांना फिर्यादी यांचा फोन आला व त्यांनी गाडी घेवुन पुणे एअरपोर्टला घ्यायला या असे सांगितल्यामुळे ते संध्याकाळी घरी गेले व रिमोटने गेट उघडून आतमध्ये गेले असता, त्यांना मुख्य दरवाजा उघडा दिसला. त्यांनी बेल वाजवली असता, घरामध्ये कोणी

नव्हते. तेव्हा त्यांनी फिर्यादी यांना फोन करुन घरामध्ये कोणी आहे का, घराचा दरवाजा उघडा आहे, घराचे खिडकीचे दोन गज कापून खाली पडलेले आहेत व दरवाजा उचकटलेला आहे, असे सांगितले. फिर्यादी यांनी त्यांच्या भावाला फोन करुन, तेथे बोलाविले. तेव्हा त्यांनी वरती त्यांच्या बेडरुममध्ये पाहिले असता, बेडरुमचा दरवाजा तोडलेला होता व कपाट उचकटलेले होते. फिर्यादी यांच्या भावाने पोलिसांना फोन केला तेथे पोलिस आले.

२८. सदर साक्षीदाराने त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन आहे की, दि.०२/०४/२०२४ रोजी फिर्यादी त्यांची पत्नी व मुलगा कराड येथे त्यांच्या घरी आले. त्यावेळी त्यांनी घराची पाहणी केली, त्यांना सोन्याचे, हि–याचे दागिणे चोरीला गेल्याचे त्यांचे निदर्शनास आले. त्यानंतर फिर्यादीने पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली. दि.३०/०६/२०२४ रोजी ते पुन्हा पोलिस स्टेशन येथे गेले होते. त्यावेळी तीन आरोपी मिळुन आले. चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी काही वस्तु मिळाल्या होत्या. पोलिसांनी त्यांचेकडून सोन्याच्या वस्तु तसेच एक चारचाकी वाहन जप्त केले होते. त्याप्रमाणे पोलिसांनी त्यांचा पुरवणी जबाब घेतला होता. दि.१४/०६/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना पंचनाम्यासाठी बोलाविले होते. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये असे मान्य केले आहे की, नरेंद्र जानुगडे यांच्या भावाने फोन केल्यानंतर पोलिस ६.४५ वा. चे दरम्यान घटनास्थळावर आले. पोलिस घटनास्थळी १० ते १०.३० पर्यंत होते. फिर्यादी हे २ तारखेला पहाटे ३.३० वा. घरी आले.

२९. सरकार पक्षातर्फे **शंकर शामराव माने (सा.क्र.१४)** यांना नि.६१ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०६/०४/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना कराड शहर पोलिस स्टेशन येथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते. पोलिस स्टेशन येथे श्री. देवकर, पोलिस कर्मचारी, आरोपी, पोकॉ. पवार हजर होते. आरोपी रमेश कुंभार याने कोठे सोने ठेवले आहे ते काढुन देतो असे निवेदन दिले होते. त्याप्रमाणे श्री.देवकर, पोलिस कर्मचारी, आरोपी, ते व पवार असे खाजगी वाहनाने आरोपीने दाखविल्याप्रमाणे कळवा ठाणेमार्गे भिवंडी येथे गेले. तेथे आरोपीने बिल्डींग दाखविली. ते बिल्डींगच्या पहिल्या मजल्यावर गेले. तेथे आरोपीने तिजोरीतील पाकीटातून कानातले कर्णफुले, जोडवी, बांगडया काढून दिले. सदरचा मुद्देमाल अंदाजे रु,६,००,०००/– चा होता. सदरचे दागिणे पोलिसांनी जप्त करुन, जप्ती पंचनामा केला. त्यानंतर भिवंडीच्या पुढे आल्यावर

हायवेला चोरी करताना वापरलेली एक्सयुव्ही महिंद्रा सिल्व्हर कलरची गाडी जप्त केली. त्यानंतर आरोपीने एक माणूस दाखवून त्याला दागिणे विकल्याचे सांगितले. त्यानंतर ते सोनाराकडे गेले. तेथून अंदाजे ६,००,०००/- चे दागिणे जप्त केले. पोलीसांनी निवेदन व जप्ती पंचनामा पुर्ण केल्यानंतर ते पुन्हा कराड येथे आले.

३०. सदर साक्षीदाराने आरोपी क्र.१ व ३ यांचेतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात मान्य केले आहे की, दि.०६/०४/२०२४ रोजी पोलिसांनी सकाळी ६.०० वा. त्यांना पोलिस स्टेशन येथे बोलाविले होते, तेथून ते भिवंडी येथे आरोपीच्या बिल्डींगमध्ये पहिल्या मजल्यावर गेले. त्यावेळी त्यांचेसोबत पोलिस देवकर, पोलिस स्टाफ व आरोपी व ते होते. भिवंडी येथे गेले त्यावेळी पंचनामा केला व तेथून महिंद्रा एक्स युव्ही गाडी जप्त केली. सोने व गाडी जप्तीचे दोन वेगवेगळे पंचनामे केले. आरोपीने त्यांचेसमक्ष निवेदन दिले होते, हे मान्य केले आहे.

३१. सरकार पक्षातर्फे **धनाजी सर्जेराव देवकर (सा.क्र.१५)** यांना नि.६४ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०२/०४/२०२४ रोजी ते कराड शहर पोलिस स्टेशन येथे कार्यरत असतांना, गु.र.नं.५१७/२०२४ हा दाखल करुन तपास त्यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांचेकडे एफआयआरची प्रत देण्यात आली होती. त्यांनी दि.०३/०४/२०२४ रोजी घटनास्थळी जावुन, घटनास्थळाचा पंचनामा केला. आरोपीने मुख्य दरवाजा तोडून, खिडकीचे गज कापून, घरामध्ये प्रवेश करुन बेडरुम मधील वॉर्डरोब तोडून त्यातील ड्रॉव्हर उचलकटून सोन्याचे, हि-याचे दागिणे चोरले होते.

३२. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मदतीने रमेश कुंभार व निलेश गाढवे यांना दि.०६/०४/२०२४ रोजी अटक केली. दि.०८/०४/२०२४ रोजी निलेश गाढवे यांनी निवेदन दिल्याप्रमाणे खाजगी गाडीने दोन पंचासह बनवडी येथे आरोपीच्या शेतातील घराच्या समोरील गोठयाच्या येथे गेले. तेथे घटनास्थळ होते. आरोपी निलेश याने पत्रा व भिंतीच्या मध्ये लपवलेले दागिणे काढून दिले. सदरचे दागिणे रमेश कुंभार याने निलेश गाढवे यास दिले होते व ते ८६ ग्रॅमचे सोन्याचे दागिणे होते. त्यानंतर सोनाराने सदर सोन्याची खात्री करुन त्याबाबतची पावती

दि.०८/०४/२०२४ रोजी दिली. सदरचे दागिणे जप्त करुन त्याचा पंचनामा केला व जप्त केलेले दागिणे मुद्देमाल कारकुनाकडे जमा केले व मुद्देमाल पावती केली.

३३. दि.०९/०४/२०२४ रोजी सदर गुन्हयातील आरोपी रमेश महादेव कुंभार यांनी सदर गुन्हयातील चोरीचे दागिणे व वाहन एका ठिकाणी ठेवलेले आहेत ते ठिकाण दाखवितो असे निवेदन दिले. त्याप्रमाणे दोन पंचासमक्ष निवेदन पंचनामा करुन खाजगी गाडीमध्ये आरोपी, पंच, पोलिस स्टाफ व सोनार असे आरोपीने सांगितल्याप्रमाणे भव नगर येथील १४ नंबरच्या बिल्डींगमध्ये पहिल्या मजल्यावर ठाणे येथे गेले. आरोपीने ते त्याचे रहाते घर आहे असे सांगितले. आरोपीने त्याच्या बेडरुम मधील कपाटातील दागिणे काढून दिले. सदरचे दागिणे ११९.५०० ग्रॅमचे सोन्याचे दागिणे होते. दागिणे दोन पंचासमक्ष जप्त करुन फोटो काढले. त्यानंतर आरोपीने गाडीची चावी लपवली होती, ती घेवुन आरोपीने रस्ता सांगितल्याप्रमाणे ते भिवंडी रोडला गेले असता, सदरची गाडी रस्त्याच्या बाजुला लावलेली होती. सदरच्या गाडीचा क्र.एमएच ४६ बीए ४५१४ असा होता. ती गाडी जप्त करुन ताब्यात घेतली. गाडीचे व सोने जप्त करतानाचे फोटो काढले व जप्ती पंचनामा केला.

३४. सदर साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, त्यानंतर आरोपी रमेश कुंभार याने फलटणच्या हद्दीमध्ये चो-या केल्या होत्या. त्यातील सोने अजय नंदलाल दास याच्या माध्यमातून पुखराज चौधरी या सोनारास विकल्याचे सांगितले. पुखराज चौधरी याने त्याच्याकडे अजय नंदलाल दास यास रमेश कुंभार याने दागिणे दिल्याचे सांगितले. तसेच त्याने त्याचे दुकानातून १४.८० ग्रॅमचे दागिणे काढून दिले. ते जप्त केले. परंतु ते दुस-या गुन्हयातील असल्यामुळे मुद्देमाल फलटण येथील गुन्हयात जमा केला व मुद्देमाल पावत्या तयार केल्या.

३५. साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, दि.१४/०४/२०२४ रोजी रमेश कुंभार यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी या गुन्हयाचे घटनास्थळ तसेच फलटण या ठिकाणी चो-या केलेले घटनास्थळ दाखवितो, असे निवेदन दिले. सदरचे निवदेन दोन पंचासमक्ष नोंदवले. त्यानंतर ते दोन पंच, आरोपी व पोलिस स्टाफ असे आरोपीच्या सांगणेप्रमाणे अर्चित बंगला शिवाजी हौसिंग सोसायटी कराड येथे गेले. तेथे आरोपी रमेश कुंभार, रफिक शेख व अंजुम शेख या तिघांनी चोरी केल्याचे सांगीतले. त्यानंतर आरोपीने औंध फलटण बारामती रोडला

सांगवीच्या पुढे गेल्यावर वाघाचीवाडी येथे भानुदास निकम यांचे घर दाखविले. दोन तीन महिन्यांपुर्वी त्या ठिकाणी चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीने पुन्हा गाडी सांगवीच्या दिशेने घेण्यास सांगितली व महेश आगवणे यांचे घरी चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपीने जिंती येथील आदित्य अशोक रणवरे यांचे घर दाखविले. तेथे चोरी केल्याचे सांगितले. त्याचा मेमोरंडम पंचनामा केला.

३६. साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, आरोपी रफिक शेख याला फलटण येथील गु.र.क्र. १५९२/२०२३ मध्ये अटक केली होती. सदर गुन्हयामध्ये या गुन्हयातील मुद्देमाल एकुण १० तोळे जप्त केले होते. सदरचा मुद्देमाल या गुन्हयात वर्ग करुन त्याप्रमाणे मुद्देमाल पावती तयार केली. सदर गुन्हयातील जप्ती पंचनाम्याची सर्टीफाईड प्रत या कामी दाखल केली. आरोपी रफिक शेख यांचा सदर गुन्हयाचे कामी ताबा घेवुन दि.२१/०६/२०२४ रोजी अटक केली. त्यानंतर आरोपीने तपासा दरम्यान निवेदन दिले की, या गुन्हयातील चोरलेल्या दागिण्यांपैकी काही दागिणे एका ठिकाणी ठेवले आहेत ते काढून देतो. त्यानुसार आरोपीच्या सांगणेप्रमाणे खाजगी वाहनाने दोन पंच, पोलिस स्टाफ, आरोपी असे राबोडी येथे गेले. ते घटनास्थळ चाळ होती. सदर मजल्यावरील किचनमधील कपाटातून ड्रॉव्हर मधून १९ ग्रॅम वजनाचे दागिणे काढून दिले. त्यानुसार सदरचे दागिणे जप्त करुन, जप्ती पंचनामा केला.

३७. सदरचे दागिणे फिर्यादीला न्यायालयाचे आदेशाने परत करुन त्याबाबतचा पंचनामा केला. फिर्याद देत असतांना, फिर्यादीच्या दागिण्याच्या वर्णनांमध्ये तफावत असल्यामुळे त्या अनुषंगाने फिर्यादीचा पुन्हा पुरवणी जबाब नोंदविला व दागिण्यांच्या पावत्या हस्तगत करुन या कामी सामील केल्या. तसेच आरोपी रमेश कुंभार यांच्या पत्नीकडून दि.१५/०४/२०२४ रोजी पोलिस स्टेशन येथे दोन मोबाईल जप्त केले होते. सदरचे मोबाईल जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा केला.

३८. दि.३०/०३/२०२४ रोजी सकाळी ६.०० ते दि.०१/०४/२०२४ चे सायंकाळी ६ चे दरम्यान शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड, अर्चित नावाच्या बंगल्यात आरोपी रमेश महादेव कुंभार, रफिक मेहबुब शेख, अंजुम इब्राहिम शेख यांनी मुख्य दरवाजा कटावणीच्या सहाय्याने उचकटुन त्याच्या शेजारील खिडकीचे दोन गज कापून घरात प्रवेश करुन, बेडरुमचा दरवाजा तोडून बेडरुम मधील वॉर्डरोब मधील

कपाटातील ड्रॉव्हरमधील सोन्याचे, हि–याचे, चांदीचे एकुण ३७,९४,०००/– किंमतीचे दागिणे, महत्वाचे कागदपत्र व वायफायचा राऊटर इ. चोरुन नेले व यातील आरोपी नामे निलेश गाढवे याने चोरीचा माल आहे, हे माहित असतांना ही तो रमेश कुंभार याचेकडून स्विकारला, हे तपासात निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले, असे सरतपासात त्यांनी नमुद केले आहे.

३९. सदर साक्षीदाराने आरोपी क्र.१ व ३ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात मान्य केले आहे की, फिर्याद देतांना फिर्यादीने दागिण्यांच्या पावत्या दिल्या नव्हत्या. सदर साक्षीदाराने आरोपी रफिक मेहबुब शेख याला दि.२१/०६/२०२४ रोजी अटक केली, त्याचा दि.११/०६/२०२४ चा मेमोरेंडम पंचनामा या कामात दाखल केलेला असून, दि.११/०६/२०२४ व दि.२३/०६/२०२४ या दोन्ही पंचनाम्यातील घटनास्थळ एकच आहे किंवा काय, याबाबत माहिती नसल्याचे त्याचे कथन आहे. तसेच रफिक शेख याच्या निवेदनाप्रमाणे मुद्देमाल जप्त केला नव्हता, ही बाब अमान्य केली आहे. तसेच चोरीस गेलेले दागिणे फिर्यादीचे नाहीत, ही बाब अमान्य केली आहे. तसेच पुखराज चौधरी व अजय नंदलाल दास याचे जबाब नोंदविले नसल्याचे मान्य केले आहे. सदर साक्षीदाराचा आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास घेण्यात आला, त्यांनी दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ चे दरम्यान नक्की किती वाजता चोरी झाली होती, याची नक्की वेळ सांगता येणार नसल्याचे नमुद केले आहे. तसेच निलेश गाढवे यास आरोपी रमेश कुंभार याने दागिणे दिल्याबाबतचा मेमोरेंडम पंचनाम्या व्यतिरिक्त इतर पुरावा दाखल केलेला नसल्याचे मान्य केले आहे.

४०. सरकार पक्षातर्फे **रोहित रमेश फारणे (सा.क्र.१६)** यांना नि.१०६ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, सन २०२४ मध्ये ते स्थानिक गुन्हे शाखा सातारा, येथे सहा.पो. निरीक्षक म्हणून कार्यरत होते. कराड शहर गु.र.क्र.५१७/२०२४ हा गुन्हा आरोपी रमेश कुंभार याने केल्याची माहिती मिळाल्याने ते, पोलिस कर्मचारी दि.०५/०४/२०२४ रोजी ठाणे येथे गेले. आरोपी ज्या भागात होता, तेथे कशेळी, ता.भिवंडी, ठाणे येथे शोध घेतला असता, दूस–या दिवशी सकाळी त्याच्या घराच्या आसपास ते थांबले असता, आरोपी त्यांना सकाळी ८ चे सुमारास रस्त्याच्या कडेला मिळुन आला. तोच आरोपी असल्याची खात्री झाल्यानंतर त्याला ताब्यात घेवुन गुन्हयाबाबत चौकशी केली असता, त्याने सदरच्या

गुन्हयाची कबुली दिली. मुद्देमालाबाबत चौकशी केली असता त्यातील काही मुद्देमाल त्याने निलेश गाढवे यांना दिल्याचे सांगितले. निलेश गाढवे हा लोणंद, ता.फलटण येथे राहण्यास असल्याचे समजले. त्यानुसार ते रमेश कुंभार याला घेवुन निलेश गाढवे यांच्याकडे लोणंद ता, फलटण येथे गेले व आरोपी निलेश गाढवे याला ताब्यात घेतले. सदर दोन्ही आरोपींना कराड शहर पोलिस स्टेशन येथील पो.उप.नि.धनाजी देवकर यांचे ताब्यात दिले.

४१. सरकार पक्षातर्फे **पृथ्वीराज योगीराज ताटे (सा.क्र.१७)** यांना नि.१११ वर तपासण्यात आले. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.११/०६/२०२४ रोजी ते स्थानिक गुन्हे शाखा सातारा, येथे सहा.पो. निरीक्षक म्हणून कार्यरत होते. दि.०८/०६/२०२४ रोजी फलटण ग्रामीणच्या गु.र.क्र.१५९२/२०२३ मध्ये रफिक शेख याला अटक केली होती. अटकेत असतांना त्याने कराड शहर येथील शिवाजी स्टेडियमच्या जवळ असणा–या घरामध्ये घरफोडी केल्याबाबत व त्याच्या वाटणीस आलेले दागिणे त्याने एका ठिकाणी ठेवलेले आहेत, ते काढून देतो अशी कबुली दिली. त्याप्रमाणे त्याचा निवेदन पंचनामा केला. त्यानंतर आरोपी, दोन पंच व पोलिस स्टाफ असे आरोपी रफिक शेख रस्ता दाखवित असल्याप्रमाणे बापूजीनगर राबोडी ठाणे येथे गेले. आरोपीने बोट दाखवून गुडुन मौला यांचे दुमजली घराच्या दुस–या मजल्यावर ४ नंबरच्या खोलीमध्ये भाडयाने राहतो असे सांगितले. त्याने खोलीमध्ये असणा–या लाकडी कपाटातून सोन्याचे दागिणे काढून दिले.

४२. साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, आरोपी रफिक याने त्यांचे साथीदार रमेश कुंभार, निलेश गाढवे, अंजुम शेख यांनी चार महिन्यांपूर्वी सांगवी, फलटण व शिवाजी स्टेडियम कराड मधील एका घरामध्ये घरफोडी करुन सोन्याचांदीचे दागिण्यांची चोरी केल्याचे सांगितले. त्यातून त्याच्या वाटणीस आलेले हे सोन्याचांदीचे दागिणे आहेत. ते एकुण १३ सोन्याचे नग होते. सदर दागिणे पंचासमक्ष जप्त केले. त्यातील काही दागिणे कराड शहर गुन्हयातील व काही दागिणे फलटण ग्रामीण गुन्हयातील होते. पुन्हा आरोपीने बाळकुंभ कोळसेत रोड ठाणे येथे काजल ज्वेलर्स नावाच्या दुकानात नेले व आरोपीने त्यांना ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र दिले होते व त्यांनी आरोपीला नवीन डिझाईनचे ५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र बनवून दिल्याचे सांगितले.

४३. साक्षीदार यांनी त्यांचे साक्षीमध्ये पुढे असे कथन केले आहे की, मुद्देमाल फलटण ग्रामीण पोलिस स्टेशन येथे जमा केला व कराड शहर पोलिस स्टेशनच्या गुन्हयातील एकुण ६ नग कराड शहर पोलिस स्टेशन येथे जमा केले. गु.र.क्र.१५९२/२०२३ या गुन्हयातील निवेदन व जप्ती पंचनाम्याची सर्टीफाइड प्रत कराड शहर पोलिस स्टेशनला दिली. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात मान्य केले आहे की, जप्त दागिणे सोन्याचे असल्याबाबत खात्री केली होती. फिर्यादीला बोलावून आरोपीची ओळखपरेड घेतली नव्हती.

४४. **आरोपी क्र.२ यांनी त्याचे कथनाच्या पुष्ठयर्थ खालील न्यायनिवाडे दाखल केलेः–**

1. **State Vs Vishal and ors, decided on 29/11/2022** - In this case Hon'ble High Court held that, The prosecution must required to prove the offence against accused beyond reasonable doubt. As well as mere recovery of stolen property isn't enough under section 411 unless the accused is knowing in possession of it.

४५. आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेकामी सरकारपक्षाने खालील बाबी सिध्द करणे गरजेचे आहेः-

आरोपींनी फिर्यादीचे राहते घराचा दरवाजा उचकटण्याचा प्रयत्न करुन खिडकीचे दोन गज कापून चोरटे गृहअतिक्रमण करुन, घरातील बेडरुमचा दरवाजा तोडून बेडरुम मधील वॉर्डरोब मधील कपाटाचे ड्रॉव्हर मधील सोन्याचे, हि–याचे, चांदीचे एकुण रु.३७,९४,०००/– किंमतीचे दागिणे, महत्वाची कागदपत्रे व वायफायचा राऊटर असा मुद्देमालाची चोरी केला व सदरचा मुद्देमाल चोरीचा आहे हे माहित असतांना, आरोपी क्र.२ यांनी आरोपी क्र.१ याचेंकडून स्विकारला.

४६. आरोपी विरुद्धचे दोषारोप सिद्ध करणे कामी सरकार पक्षातर्फे एकूण 17 साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्रमांक एक हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी आहेत तसेच सा.क्र.९ ही फिर्यादीची पत्नी आहे. फिर्यादीच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ३०/०३/२०२४ रोजी ते व त्यांची पत्नी त्यांच्या मुलाचा अपघात झाला म्हणून कराड वरून बेंगलोर येथे गेले होते. दिनांक ०१/०४/२०२४ रोजी

त्यांच्या मुलाला हॉस्पिटल मधून डिस्चार्ज दिल्यानंतर कराड येथे येण्यासाठी त्यांनी त्यांचा ड्रायव्हर दत्तासिंग गोरखा याला फोन करून गाडी घेऊन पुणे विमानतळावर येण्यासाठी सांगितले तेव्हा त्यांचा ड्रायव्हर दिनांक ०१/०४/२०२४ रोजी संध्याकाळी सहाच्या दरम्यान त्याचे घरी गेला असता त्याला घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. मुख्य दरवाज्याच्या शेजारी असलेले खिडकीचे दोन गज खाली कापून टाकलेले दिसले त्यामुळे चालकाने त्यांना फोन करून दरवाजा उघडा असल्याचे व खिडकीचे गज कापल्याचे सांगितल्यामुळे फिर्यादी यांनी त्यांचा भाऊ विनोद जानुगडे यांना फोन करून घरात काय झाले आहे ते बघण्यासाठी सांगितले. त्यांच्या भावाने घरी जाऊन पाहिले असता चोरी झाल्याचे दिसले व ते त्यांनी फिर्यादीस सांगितल्याचे फिर्यादीच्या साक्षीवरून दिसून येते.

४७. दिनांक ०२/०४/२०२४ रोजी पहाटे तीन वाजता फिर्यादी कराड येथे आल्यावर त्यांना खिडकीचे दोन गज कापल्याचे दिसून आले तसेच मुख्य दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला होता. बेडरूमचा दरवाजा, बेडरूमच्या कपाटाचे लॉक, कपाटातील दोन ड्रॉव्हरचे लॉक तोडलेले होते व त्यातून सोन्याचे, हिऱ्याचे दागिने, चांदीची ताट, ग्लास, भांडी, वाटया असे एकूण ३७,९४,०००/– दागिने तसेच एअरटेलचा राऊटर, महत्त्वाचे कागदपत्र त्यांच्या पत्नीचे पॅन कार्ड, बँक ऑफ बडोदा चे एटीएम, हिऱ्यांच्या दागिन्यांचे व्हॅल्युएशन सर्टिफिकेट, इत्यादी कागदपत्र चोरीस गेले होते. त्यामुळे त्यांनी दिनांक ०२/०४/२०२४ रोजी अज्ञात इसमाविरुद्ध फिर्याद दिली. आरोपीची नावे रमेश कुंभार, रफिक शेख, अंजुम शेख व निलेश गाढवे असल्याचे त्यांना पोलिसांकडून समजले तसेच चोरीस गेलेल्या दागिन्यांपैकी त्यांना साडे बावीस तोळे सोन्याचे दागिने परत मिळालेले आहेत. तसेच ११ ते १३ तोळे मिळणेकामी अर्ज दाखल केल्याचे त्याचे कथन आहे. फिर्यादीने आरोपी क्रमांक दोन तर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये मान्य केले आहे की त्यांना चोरी झाल्याबाबत फोन एक तारखेला आला होता परंतु ते बेंगलोर येथे असल्यामुळे व त्यांना वेळ न मिळाल्यामुळे त्यांनी दिनांक ०१/०४/२०२४ रोजी ऑनलाईन फिर्याद दिली नाही. त्याचप्रमाणे चोरी किती वाजता झाली, कोणी केली याबाबत ते बेंगलोर येथे असल्यामुळे त्यांना माहिती नसल्याचे फिर्यादीच्या पुराव्यावरुन दिसुन येते.

४८. साक्षीदार क्रमांक ९ उमा नरेंद्र जानुगडे ही फिर्यादीची पत्नी असून त्यांनी सुद्धा ते व त्यांचे पती दिनांक ३०/०३/२०२४ रोजी त्यांचा मुलगा अर्चित

याचा अपघात झाल्यामुळे बेंग्लोर येथे गेले होते. तेथे ते दोन दिवस राहिले व दिनांक ०१/०४/२०२४ रोजी त्यांनी त्यांचा चालक दत्तासिंग याला पुणे विमानतळावर घेण्यास येण्यासाठी फोन केला असता त्यांचा चालक घरी गाडी आणण्यासाठी गेला त्यावेळी लॉक उघडून आतमध्ये आल्यावर चालकास घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला चालकाने चोरी झाल्याचे सांगितले त्यामुळे त्यांच्या दिराला त्यांचे पतीने फोन करून घरी जाण्यासाठी सांगितले. साक्षीदार क्र.९ च्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, दिनांक ०२/०४/२०२४ रोजी ते पहाटे कराड येथे पोहोचले. त्यावेळी त्यांच्या घराचा मुख्य दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला होता. खिडकी शेजारील दोन गज तोडलेले होते घरातील वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या मास्टर बेडरूम चा दरवाजा तोडून वॉर्डरोपचे लॉक व ड्रॉव्हरचे लॉक तोडून त्यातील सोन्या चांदीचे, डायमंडचे दागिणे असे एकूण मिळून ६५ तोळे, हिऱ्याचे 25 लाखाचे दागिणे व चांदीचे तीन ते चार किलो चे दागिने, घरातील वायफाय चे राऊटर व कागदपत्र चोरीस गेले होते. त्यामुळे त्यांच्या पतीने पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. दिनांक ३०/०६/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना पुन्हा पोलीस स्टेशन येथे बोलावले होते व त्यांना पहिल्यांदा 20 व नंतर ११ तोळे सोने परत मिळाले आहेत.

४९. फिर्यादी व त्याची पत्नी हे साक्षीदार क्र.१० हयांचा अपघात झाल्यामुळे घर बंद करुन बेंग्लोर येथे दि.३०/०३/२०२४ रोजी गेल्याचे सा.क्र.१ व सा.क्र.९ यांचे कथन आहे. साक्षीदार क्रमांक १० हा फिर्यादीचा मुलगा असून त्यांनी सुध्दा सा.क्र.१ व ९ हे त्याचा अपघात झाल्यामुळे दि.३१/०३/२०२४ रोजी बेंग्लोर येथे आल्याचे मान्य केले आहे. त्यांनी दोन दिवस उपचार घेतल्यानंतर दिनांक ०१/०४/२०२४ रोजी त्यांचा चालक दत्तासिंग यांना पुणे विमानतळावर त्यांना घेण्यास येण्यास सांगितले असता त्यांचा चालक त्यांच्या कराड येथील घरी गेला असता त्यांना त्यांच्या घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला त्यामुळे त्यांच्या चालकाने त्यांच्या वडिलांना फोन करून घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचे सांगितले तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांचे चुलते यांना फोन करून घरी जाण्यासाठी सांगितले, त्यांचे चुलते घरी गेले असता, त्यांनी घराचा मुख्य दरवाजा उघडा असून बाजूच्या खिडकीचे गज कापलेले असल्याचे त्यांना सांगितले. दिनांक ०२/०४/२०२४ रोजी पहाटे ते व त्यांचे आईवडिल त्यांच्या कराड येथील घरी आले असता त्यांना मास्टर बेडचा दरवाजा तोडलेला दिसला तसेच वॉर्डरूपचे लॉक तोडून त्यातील सोन्या चांदीचे, डायमंडचे दागिने, वाय-फाय चा राऊटर व घरातील कागदपत्रे चोरीस गेल्याचे दिसून

आले त्यामुळे त्यांच्या वडिलांनी पोलीस स्टेशन येथे जाऊन फिर्याद दिल्याचे त्यांचे कथन आहे

५०. साक्षीदार क्रमांक १३ हे फिर्यादी यांचे चालक आहेत. त्याचे पुराव्यात असे आले की, दिनांक ३०/०३/२०२४ रोजी फिर्यादी यांच्या मुलाचा अपघात झालेला होता. त्यामुळे फिर्यादी व त्याची पत्नी यांस बेंगलोर येथे जावयाचे असल्याचे त्याच दिवशी सकाळी सहा वाजता त्यांनी त्यांना पुणे एअरपोर्टवर सोडले व पुन्हा कराड येथे परत आले दिनांक ०१/०४/२०२४ रोजी दुपारी फिर्यादी यांचा त्यांना फोन आला व त्यांना घेण्यासाठी पुणे एअरपोर्टला बोलवले म्हणून ते संध्याकाळी अर्चित बंगला येथे गेले असता, त्यांना घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला त्यांनी बेल वाजवली असता घरामध्ये कोणीही नव्हते तेव्हा त्यांनी फिर्यादी यांना फोन करून घराचा दरवाजा उघडा आहे. घराच्या खिडकीचे दोन गज कापून खाली पडलेले आहेत, दरवाजा उचकटलेला आहे असे सांगितले. तेव्हा फिर्यादी यांनी त्यांच्या भाऊ विनोद जानुगडे यांना फोन करून तेथे बोलावले. तेव्हा फिर्यादीच्या भावाने बेडरूम मध्ये पाहिले असता बेडरूम चा दरवाजा तोडलेला होता कपाट उचकटलेले होते. दिनांक ०२/०४/२०२४ रोजी फिर्यादी त्यांची पत्नी व मुलगा कराड येथे आल्यावर त्यांनी घराची पाहणी केली. तेव्हा त्यांना सोने व हिऱ्याचे दागिणे तसेच चांदीची भांडी चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. चोरीस गेलेल्या मुद्देमाला पैकी काही दागिणे फिर्यादी यांना परत मिळालेले आहेत एकूण तीन आरोपी मिळून आल्याचे त्याचे पुराव्यावरुन दिसून येते.

५१. साक्षीदार क्रमांक १२ हे फिर्यादीचे भाऊ आहेत. त्यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, दिनांक ३०/०३/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांच्या पत्नीसोबत त्यांच्या मुलाचा अपघात झाला होता त्यामुळे बेंगलोर येथे गेले होते. दिनांक ०१/०४/२०२४ रोजी त्यांना त्यांच्या भावाचा फोन आला व त्यांनी सांगितले की त्यांचा चालक दत्तासिंग हा घरी गाडीची चावी घेण्यासाठी आला आहे. त्याला घराचा दरवाजा उघडा दिसत आहे म्हणून फिर्यादीने सा.क्र.१२ यास घरी जाऊन खात्री करण्यासाठी सांगितले त्यावेळी सा.क्र.१२ हे फिर्यादीच्या घरी गेले असता, त्यांना फिर्यादी यांच्या घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला. तो कटावणीने उचकटला होता. खिडकीचे दोन गज कापलेले होते व घरातील सर्वसामान अस्ताव्यस्त पडलेले होते. त्यांनी सद्यस्थिती फिर्यादीला फोन करून कळवली. फिर्यादी दिनांक

०२/०४/२०२४ रोजी कराड येथे आले व त्यांनी घराची पाहणी केली असता, त्यांना घरातील सोन्याचे, हिऱ्याचे दागिने, वायफायचा राऊटर व कागदपत्र चोरीला गेल्याचे दिसले. त्यामुळे फिर्यादीने फिर्याद दिली. पोलिसांकडून त्यांना आरोपींची नावे रमेश कुंभार, रफिक शेख, अंजुम शेख व गाढवे असल्याचे नंतर समजले तसेच चोरीला गेलेल्या दागिन्यांपैकी काही दागिने आरोपींकडून जप्त केले होते.

५२. साक्षीदार क्रमांक एक हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी आहेत. त्यांच्या साक्षीवरून हे स्पष्ट दिसून येते की दिनांक ३०/०३/२०२४ रोजी फिर्यादी व त्यांची पत्नी हे त्यांच्या मुलाचा अपघात झाल्यामुळे घर बंद करुन बेंगलोर येथे गेले होते व त्यांना पुन्हा कराड येथे यायचे असल्यामुळे त्यांनी ०१/०४/२०२४ रोजी त्यांचा चालक दत्तासिंग गोरखा याला फोन केला व गाडी घेऊन त्याला पुणे विमानतळावर बोलवले होते. सदरची बाब साक्षीदार क्रमांक ९, १०, १२ व सा.क्र. १३ यांनी सुद्धा त्यांच्या पुराव्यामध्ये मान्य केली आहे. फिर्यादी यांनी सांगितल्याप्रमाणे साक्षीदार क्रमांक 13 हे फिर्यादी यांच्या घरी अर्चित बंगला शिवाजीनगर हौसिंग सोयायटी कराड येथे गाडी घेण्यासाठी गेले असता, त्यांना घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला व खिडकीचे गज कापलेले दिसले. त्यामुळे त्यांनी फिर्यादी यांना फोन करून सदरची घटना सांगितली. त्यामुळे फिर्यादी यांनी त्यांच्या भावाला फोन करून अर्चित बंगला येथे बोलवले त्यावेळी फिर्यादी यांचे भाऊ हे घटनास्थळी आले व त्यांनी घराची पाहणी केली असता त्यांना घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले व त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आल्यामुळे त्यांनी सदरची घटना फिर्यादीस सांगितल्याचे साक्षीदार क्र.१, ९, १०, १२ व १३ यांचे साक्षीवरून दिसून येते. त्यानंतर फिर्यादी, त्यांची पत्नी व मुलगा हे दिनांक ०२/०४/२०२४ रोजी कराड येथे परत आल्यावर त्यांनी घराची पाहणी केली असता त्यांना घराचा मुख्य दरवाजा हा तोडण्याचा प्रयत्न केला होता. खिडकीचे गज कापलेले होते. बेडरूमचा दरवाजा तोडलेला व कपाटाचे लॉक, कपाटातील दोन ड्रॉव्हर तोडलेले दिसुन आले व त्यातून सोन्याचे, हिऱ्याचे दागिणे, चांदीचे ताट, वाटी, ग्लास भांडी इत्यादी एकूण ३७,९४,०००/- चे दागिने चोरीस गेल्याचे दिसून आल्याचे त्याचे पुराव्यावरुन स्पष्ट होते.

५३. साक्षीदार क्रमांक १२ व १३ हे घटनास्थळावर येवून त्यांनी घराची पाहणी केल्यानंतर त्यांना घरातल्या वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या दिसल्या व चोरी झाल्याचे समजल्याने साक्षीदार क्रमांक 12 व 13 यांनी फिर्यादी यांना फोन करून

सदरची घटना सांगितल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे बेंग्लोर येथून दिनांक ०२/०४/२०२४ रोजी परत आल्यानंतर फिर्यादीने त्याचे घराची पाहणी केली असता, चोरी झाल्याचे दिसून आल्यामुळे त्यांनी अज्ञात इसमाविरुद्ध फिर्याद दिल्याचे स्पष्ट होते. फिर्यादी तसेच साक्षीदार क्रमांक 12 यांनी आरोपींची नावे रमेश कुंभार, रफिक शेख, अंजुम शेख, निलेश गाढवे असल्याचे त्यांना पोलिसांकडून समजल्याचे तसेच साक्षीदार क्रमांक 13 यांनी तीन आरोपी मिळून आल्याचे त्यांच्या पुराव्यामध्ये नमुद केले आहे.

५४. साक्षीदार क्रमांक तीन हे प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंच आहेत. दिनांक ०३/०४/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना फिर्यादी यांच्या शिवाजीनगर हाउसिंग सोसायटी येथील अर्चित बंगल्यामध्ये घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलवल्याचे त्यांनी मान्य केले. पोलिसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला घटनास्थळावरील घर हे दुमजली होते. त्याच्या मुख्य दरवाजाच्या बाजूला असलेल्या खिडकीचे गज कापलेले होते. मुख्य दरवाजाला कटवण्याच्या खुणा पडलेल्या होत्या. मुख्य दरवाजातून आत मध्ये गेल्यावर बेडरूमच्या आत मधील कपाटाचा दरवाजा मोडलेला होता. ड्रॉव्हरमधील कपडे अस्तावस्त पडलेले होते. तसेच सोन्या–चांदीचे दागिने, राऊटर व महत्त्वाचे कागदपत्र चोरीस गेल्याचे त्यांचे कथन आहे. साक्षीदार क्रमांक पाच हे फोटोग्राफर असून त्यांनी सुध्दा दिनांक ०३/०४/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना घटनास्थळ पंचनाम्याचे फोटो काढण्यासाठी शिवाजी स्टेडियम, शिवाजीनगर हाऊसिंग सोसायटी येथील अर्चित बंगल्यात बोलाविले व त्यांनी त्यांच्या कॅमेरा मध्ये घटनास्थळाचे एकूण पंधरा फोटोग्राफ्स काढले हे त्यांनी मान्य केले आहे. त्याचप्रमाणे तपासी अंमलदार यांनी सुध्दा दि.०३/०४/२०२४ रोजी घटनास्थळाचा पंचनामा केल्याचे नमुद केले आहे. सा.क्र.९, १०, १२ व १३, फिर्यादी तसेच तपासी अंमलदार याचे पुराव्यावरुन अर्चित बंगला शिवाजीनगर हौसिंग सोसायटी, कराड येथे दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ च्या दरम्यान फिर्यादी व त्याची पत्नी घरी नसतांना चोरी झाल्याचे स्पष्ट होते. तसेच सा.क्र.३ घटनास्थळ पंच यांनीसुध्दा घटनास्थळावर चोरी झाल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे फिर्यादी यांनी दि.०२/०४/२०२४ रोजी घटनेची दिलेली फिर्याद सरकारपक्षातर्फे शाबित करण्यात आलेली आहे.

५५. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी क्र. २ यांचा निवेदन व जप्ती पंचनामा

सिध्द करणेकामी सरकार पक्षातर्फे सा.क्र.२ यांना तपासण्यात आले. सा.क्र.२ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, दि.०८/०४/२०२४ रोजी ते त्यांच्या कामानिमित्त पोलिस स्टेशन येथे गेले असता, आरोपी क्र. २ याने निवेदन दिले की, त्यांचा मित्र रमेश कुंभार याने चोरी केलेले सोने त्याने त्याच्याकडे त्याच्या गावी शेडमध्ये ठेवले आहे ते काढुन देतो. आरोपी क्र.२ ने त्याचे निवेदनाप्रमाणे बनवडी, ता.कोरेगाव येथील गाईच्या गोठयातुन दोन पत्राच्या मधुन शेड मधून कापडात गुंडाळलेले सोने काढुन दिले. सदरच्या दागिण्यांमध्ये एक मंगळसुत्र, कानातले टॉप्स, झुमके व चेन होती. पोलिसांनी त्याचा पंचनामा केल्याचे सा.क्र.२ याचे पुराव्यावरुन दिसून येते. त्याप्रमाणे सा.क्र.७ यांनी सुध्दा दि.०८/०४/२०२४ रोजी गु.र.क्र.५१७/२०२४ या गुन्हयाचा मेमोरंडम पंचनामा करण्यासाठी त्यांना पोलिसांनी बोलविल्याचे त्याचे कथन आहे. त्याप्रमाणे आरोपी क्र.२ याने त्याचे निवेदनानुसार बनवडी, ता.कोरेगाव येथील एका पत्राच्या शेडमधून सोन्याचे दागिणे काढून दिल्याचे त्यांच्या पुराव्या वरुन दिसुन येते. तसेच सा.क्र.११ हे सोनार असून, त्यांनी दि.०८/०४/२०२४ रोजी त्यांना पो.उ.नि. श्री. देवकर यांचा फोन आल्यामुळे ते श्री.देवकर व आरोपी यांचेसोबत बनवडी, ता.कोरेगांव येथे गेले होते. तेथे आरोपीने शेडमध्ये ठेवलेले ८६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे काढून दिले, त्यांनी ते सोने आहे, याची खात्री करुन पावती दिल्याचे मान्य केले आहे.

५६. तसेच सा.क्र.१६ हे स्थानिक गुन्हे शाखा सातारा येथे कार्यरत असतांना, त्यांनी आरोपी क्र.१ याने कराड शहर गु.र.क्र.५१७/२०२४ केल्याची माहिती मिळाल्याने त्यांनी आरोपी क्र.१ यास कशेळी, भिवंडी येथून ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी केली असता, आरोपी क्र.१ ने सदर गुन्हयाची कबुली दिली व त्यातील काही मुद्देमाल त्याने आरोपी क्र.२ कडे ठेवल्याचे सा.क्र.१६ यांनी पुराव्यामध्ये नमुद केल्याचे दिसुन येते. त्याप्रमाणे तपासी अंमलदार यांनी आरोपी क्र.२ च्या निवेदनानुसार आरोपी क्र.२ याचे घराच्या समोरील गोठयामधुन ८६ ग्रॅम वजनाचे दागिणे आरोपी क्र.२ ने काढुन दिल्याचे कथन केले आहे. त्यामुळे आरोपी क्र.१ व ३ यांनी अर्चित बंगला शिवाजीनगर हौसिंग सोसायटी, ता.कराड येथे दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ रोजीचे दरम्यान चोरी करुन त्यातील काही चोरीचे दागिणे आरोपी क्र.१ यांनी आरोपी क्र.२ याच्याकडे दिल्याचे व आरोपी क्र.२ ने चोरीचे दागिणे आरोपी क्र.१ कडून स्विकारले व नंतर ते काढून दिल्याचे नि.क्र.२८ वरील आरोपी क्र.२ च्या जप्ती व निवेदन पंचनाम्यानुसार स्पष्ट होते.

५७. त्याचप्रमाणे आरोपी क्र.१ चा निवेदन पंचनामा शाबीत करणेकामी सरकार पक्षातर्फे सा.क्र.४ यांना तपासण्यात आले. सा.क्र.४ च्या पुराव्यात असे आले आहे की, आरोपी रमेश कुंभार हा पोलिस स्टेशनमध्ये दि.१४/०४/२०२४ रोजी हजर होता. त्याने कुठे कुठे घरफोडी केली आहे, ते ठिकाण दाखवितो म्हणून निवेदन दिले होते. आरोपी क्र.१ च्या निवेदनानुसार ते, आरोपी, पंच व पोलिस शिवाजीनगर हौसिंग सोसायटीमध्ये अर्चित बंगला येथे गेले तेथे आरोपीने चोरी केल्याचे सांगितले. त्यानंतर तेथून पुढे आरोपीने सांगितल्याप्रमाणे फलटण येथे गेल्यावर आरोपीने तीन ठिकाणे दाखविली व त्यातील एक घर वाघवणे यांचे होते, तेथे चोरी केल्याचे सांगितले. तसेच तपासी अंमलदार यांचे कथनानुसार सुध्दा आरोपी क्र.१ ने दि.१४/०४/२०२४ रोजी निवेदन दिले व त्याचप्रमाणे चोरी केलेले घटनास्थळ शिवाजी स्टेडीयम कराड येथील अर्चित बंगला व फलटण येथील चोरी केलली ठिकाणे दाखवल्याचे दिसून येते त्यामुळे सदरचा निवेदन पंचनामा नि.३२ वर सरकारपक्षाने शाबित केलेला आहे.

५८. त्याचप्रमाणे सरकारपक्षातर्फे आरोपी क्र.१ याचा निवेदन व जप्ती पंचनामा सिध्द करणेकामी सा.क्र.१४ यांना तपासण्यात आले. त्याचे पुराव्यावरुन असे दिसुन येते की, आरोपी क्र.१ ने याने दिलेल्या निवेदनानुसार सा.क्र.१४, आरोपी, पोलिस व पंच असे भिवंडी येथील बिल्डींगमध्ये गेले असता, आरोपीने त्याच्या घरातील तिजोरीतील पाकीटातून कानातील कर्णफुले, जोडवी, बांगडया असा अंदाजे ६,००,०००/- चा मुद्देमाल काढुन दिला व त्यानंतर भिवंडीच्या पुढे गेल्यावर हायवेला चोरी करतांना वापरलेली एक्सयुव्ही महिंद्रा सिल्व्हर कलरची गाडी जप्त केली व त्यानंतर आरोपीने एक सोनाराकडे नेले, तेथून अंदाजे सहा लाखाचे दागिणे जप्त केल्याचे साक्षीदार क्र.१४ चे कथन आहे. तसेच सा.क्र.११ हे सोनार असुन त्यांनी सुध्दा ते, पोलिस व आरोपी असे दि.०९/०४/२०२४ रोजी आरोपी क्र.१ च्या घरी कशेळी ठाणे येथे गेले होते. आरोपी क्र.१ ने कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिणे काढून दिले. त्याप्रमाणे सा.क्र.११ यांनी सदरच्या दागिण्यांची खात्री करुन, त्याची पावती श्री. देवकर यांना दिल्याचे त्याचे साक्षीमध्ये नमुद केलेले आहे. तसेच तपासी अंमलदार यांनीसुध्दा त्याचे साक्षीमध्ये आरोपी क्र.१ याचेकडून त्याचे निवेदनाप्रमाणे दि.०९/०४/२०२४ रोजी त्याचे घराच्या कपाटातून ११९.५०० ग्रॅम वजनाचे दागिणे तसेच भिवंडी येथून महिंद्र एक्सयुव्ही गाडी क्र. एमएच ४६ बीए ४५१४ तसेच सोनाराकडून १४.८० ग्रॅम वजनाचे दागिणे जप्त केल्याचे दिसुन येते. आरोपी क्र.१ ने

नि.३२ वरील निवेदन पंचनाम्यात नमुद केल्याप्रमाणे अर्चित बंगला शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड येथे चोरी केलेले दागिणे त्याचे नि.६२ वरील निवेदनाप्रमाणे काढुन दिल्याने सरकार पक्षाने नि.६२ वरील आरोपी क्र.१ चा निवेदन व जप्ती पंचनामा सिध्द केलेला आहे.

५९. तपासी अंमलदार यांनी त्याचे साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, आरोपी क्र.३ यास फलटण येथील गु.र.क्र.१५९२/२०२३ मध्ये अटक केली होती. फलटण ग्रा. गुन्हयामध्ये या गुन्हयातील १० तोळे मुद्देमाल जप्त केला होता. त्याप्रमाणे त्यांनी मुद्देमाल वर्ग करुन मुद्देमाल पावती फाडली. त्यानुसार दि.२१/०६/२०२४ रोजी आरोपी क्र.३ रफिक शेख यास अटक करुन, त्याच्या निवेदनाप्रमाणे ते राबोडी येथे गेले असता, आरोपी क्र.३ ने घरातुन एका चाळीतील किचन मधील कपाटातून १९ ग्रॅम वजनाचे दागिणे काढून दिले. त्याचा जप्ती पंचनामा केला. सदरचा जप्ती व निवेदन पंचनामा सरकारपक्षाने नि.क्र.७७ व ७८ वर शाबित केले आहे.

६०. सरकार पक्षातर्फे आरोपी क्र.३ चा जप्ती व निवेदन पंचनामा सिध्द करणेकामी सरकारपक्षातर्फे सा.क्र.१७ यांना तपासण्यात आले. सदरचा पंचनामा सा.क्र.१७ यांनी केलेला आहे. सा.क्र.१७ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे कथन केले आहे की, फलटण ग्रा.गु.र.क्र.१५९२/२०२३ या गुन्हयामध्ये अटकेत असणारा आरोपी रफिक शेख याने शिवाजी स्टेडीयम कराड जवळ असणा–या घरामध्ये घरफोडी केल्याचे व त्याच्या वाटणीस आलेले दागिणे काढून देतो अशी कबुली दिली. त्याप्रमाणे आरोपी क्र. ३ च्या निवेदनाप्रमाणे बापूजी नगर राबोडी ठाणे येथील गुडुनमौला शेख यांच्या दुमजली घरातून दुस–या मजल्यावरील ४ नंबरच्या खोलीतील लाकडी कपाटातून आरोपी रफिक शेख याने सोन्याचे दागिणे काढून दिल्याचे सा.क्र.१७ याचे कथन आहे. त्याचप्रमाणे आरोपी रफिक शेख याने त्याचे साथीदार रमेश कुंभार, निलेश गाढवे, अंजुम शेख यांनी ४ महिन्यांपुर्वी सांगवी, फलटण, शिवाजी स्टेडीयम कराड, मधील घरामध्ये घरफोडी करुन सोन्याचांदीच्या दागिण्यांची चोरी केल्याचे व त्याचे वाटणीस आलेले १३ सोन्याचे नग मिनी मंगळसुत्र, कानातील टॉप्स, सोन्याची जोडवी, सोन्याचे पैजंण, सोन्याचे नेकलेस, सोन्याची बाळी, सोन्याचे डोर्ले, सोन्याचा झुमका इ. जप्त केले. त्यातील काही दागिणे कराड शहर पोलिस स्टेशन व काही फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या गुन्हयातील होते. त्यातील ६ नग हे कराड शहर पोलिस स्टेशनच्या गुन्हयातील असल्याने ते कराड शहर पोलिस स्टेशनच्या

गुन्हयामध्ये जमा केल्याचे सा.क्र.१७ च्या पुराव्यावरुन दिसुन येते. आरोपी क्र.३ च्या नि.७७ व ७८ वरील निवेदन व जप्ती पंचनाम्यानुसार आरोपी क्र.३ कडून १९ ग्रॅम वजनाचे दागिणे तपासी अधिकारी यांनी जप्त केल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे फलटण ग्रामीण येथील सी.आर. क्र.१५९२/२०२३ हया गुन्हयातुन सदर गुन्हयात ६ सोन्याचे नग जमा केल्याचे सा.क्र.१७ याचे कथन आहे. त्यामुळे सरकार पक्षाने नि.७७ व ७८ वरील जप्ती व निवेदन पंचनामा तसेच नि.११२ वरील सी.आर.नं.१५९२/२०२३ फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन मधील जप्ती व निवेदन पंचनामा शाबीत केलेला आहे.

६१. तसेच सरकार पक्षातर्फे नि.३९ वर मोबाईल जप्तीचा पंचनामा दाखल करण्यात आला. सदरचा जप्ती पंचनामा सिध्द करण्याकामी सरकार पक्षातर्फे सा.क्र.६ यांना तपासण्यात आले. त्यांनी दि.१५/०४/२०२४ रोजी ते व दूसरा पंच व पोलिस व रेश्मा कुंभार पोलिस स्टेशन येथे हजर होत्या. रेश्मा कुंभार यांनी दोन मोबाईल पोलसांना दिले होते. त्यांनी त्याचा जप्ती पंचनामा केल्याचे मान्य केले आहे.

६२. आरोपी क्र.१ व २ यांचे नि.क्र.२८, ३२ व ६२ वरील जप्ती व निवेदन पंचनामे तसेच आरोपी क्र.३ यांचा नि.क्र.७७ व ७८ वरील निवेदन व जप्ती पंचनामा तसेच आरोपी क्र.३ यांचा फलटण ग्रामीण येथील सी.आर.क्र.१५९२/२०२३ मधील नि.११२ वरील जप्ती व निवेदन पंचनाम्यानुसार व आरोपी क्र.१ व ३ यांनी शिवाजीनगर हौसिंग सोसायटी, कराड येथील अर्चित बंगला येथे दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ रोजीचे दरम्यान चोरी केल्याचे त्याप्रमाणे त्यानी चोरलेले काही सोन्याचे दागिणे काढून दिल्याचे व ते पोलिसांनी जप्त केल्याचे त्याचे निवेदन व जप्ती पंचनाम्यावरुन स्पष्ट होते.

६३. फिर्यादी व त्याची पत्नी दि.३०/०३/२०२४ रोजी ते त्यांच्या मुलाचा अपघात झाल्यामुळे त्याला भेटण्यासाठी घर बंद करुन बेंग्लोर येथे गेले होते. ते कराड येथे परत येण्यासाठी त्यांनी त्यांचा चालक दत्तासिंग गोरखा याला फोन केला असता, त्यांचा चालक दि.०१/०४/२०२४ रोजी फिर्यादी यांच्या राहत्या घरी अर्चित बंगला, शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड येथे गेला असता, त्याच्या चालकास फिर्यादी यांचे घराचा मुख्य दरवाजा उघडा दिसला तसेच खिडकीचे दोन गज कापलेले दिसले म्हणून त्यांनी फिर्यादीला फोन केला असता, फिर्यादीने सा.क्र.१२ यांना घटनास्थळावर पाठविले. त्यावेळी सा.क्र.१२ यांनी घराचा मुख्य दरवाजा उघडा

असून, घरातील सामान अस्ताव्यस्त पडल्याचे फिर्यादी यांना सांगितल्याचे दिसून येते. फिर्यादी, त्याची पत्नी व मुलगा दि.०२/०४/२०२४ रोजी कराड येथे परत आले असता, त्यांना घराचा मुख्य दरवाजा कटावणीने उचकटल्याचे दिसून आले. तसेच मुख्य दरवाजाच्या बाजुच्या खिडक्यांचे दोन गज कापलेले होते. घरातील सोन्याचे, हि–याचे दागिणे, वायफायचा राऊटर, हि–याच्या दागिण्यांचे व्हॅल्युएशन सर्टीफिकेट तसेच चांदीची ताट, वाटी, ग्लास असे एकुण रु.३७,९४,०००/– दागिणे चोरीस गेल्याचे दिसून आले.

६४. अभिलेखाचे अवलोकन करता, घटनेच्या वेळी सा.क्र.१, ९ व १० हे बेंग्लोर येथे होते. त्यांना सदर घटनेची बातमी त्यांचा चालक सा.क्र.१३ यांनी सांगीतली. तसेच सा.क्र.१२ व १३ यांनी सदर घटनास्थळी जावुन घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचे व चोरी झाल्याचे फिर्यादीला सांगितल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी दि.०२/०४/२०२४ रोजी कराड येथे आल्यानंतर चोरी झाल्याची शहानिशा करुन चोरीस गेलेल्या दागिणे व वस्तुंबाबत फिर्याद दिल्याचे दिसून येते. सदरची फिर्याद सरकारपक्षाने नि.क्र.२० वर शाबित केली आहे. सदरच्या चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी काही दागिने फिर्यादीस परत मिळाले असून, त्याबाबतचा पंचनामा नि.६० वर सरकार पक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे.

६५. सा.क्र.१, ९,१०, १२, १३ व तपासी अंमलदार याचे साक्षीपुराव्यावरुन शिवाजीनगर हौसिंग सोसायटी अर्चित बंगला कराड येथे दि.३०/०३/२०२४ ते दि.०१/०४/२०२४ चे दरम्यान चोरी झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे आरोपी क्र.१ ते ३ यांच्या नि.२८, ३२, ६२ व नि.७७ व ७८ तसेच नि.११२ ला दाखल केलेल्या जप्ती व निवेदन पंचनाम्यानुसार आरोपी क्र.१ व ३ यांनी अर्चित बंगला शिवाजीनगर हौसिंग सोसायटी कराड येथे चोरी केल्याचे त्यांच्या निवेदन व जप्ती पंचनाम्यावरुन स्पष्ट होते. त्याचप्रमाणे आरोपी क्र.१ ने चोरी केलेल्या दागिण्यापैकी काही दागिणे त्यांनी आरोपी क्र.२ यांना दिल्याचे व आरोपी क्र.२ ने ते चोरीचे आहेत हे माहित असून सुध्दा ते स्विकारल्याचे व त्याचेकडून जप्त केल्याचे आरोपी क्र.१ व २ यांच्या नि.२८, ३२, ६२ वरील निवेदन व जप्ती पंचनामे तसेच सरकार पक्षातर्फे सदरचे निवेदन व जप्ती पंचनामे सिध्द करणेकामी तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्यावरुन स्पष्ट होते. तसेच आरोपी क्र.३ यांचेकडुन सुध्दा नि.७७, ७८ व ११२ च्या निवेदन व जप्ती पंचनाम्यानुसार मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

वरील बाबींचा विचार करता, फिर्यादी व तपासी अंमलदार यांच्या कथनास सा.क्र. ९ व १०, १२ व १३ हे दुजोरा देतात. तसेच प्रस्तुत प्रकरणातील सा.क्र.३ हे घटनास्थळ पंच असून, त्यांनी सुध्दा घटनास्थळावर चोरी झाल्याचे मान्य केले आहे.

६६. सबब, दि.३०/०३/२०२४ रोजी मौजे कराड, ता.कराड हद्दीतील शिवाजीनगर हौसिंग सोसायटी येथे सकाळी ०६.०० ते दि.०१/०४/२०२४ रोजीचे सायंकाळी ६.३० चे सुमारास फिर्यादी व त्याची पत्नी घरी नसताना आरोपी क्र.१ व ३ यांनी फिर्यादीच्या घराचा मुख्य दरवाजा कटावणीच्या सहाय्याने उघडण्याचा प्रयत्न केला व दरवाजा शेजारील खिडकी उचकटुन दोन गज कापुन आरोपींनी घरात प्रवेश करुन बेडरुमचा दरवाजा तोडुन बेडरुममधील वॉर्डरोब मधील ड्रॉव्हरमधील सोन्याचे, हि-याचे व चांदीचे दागिणे व महत्वाचे कागदपत्र, वरच्या हॉलमधील वायफायचा राऊटर असे एकुण र.रु.३७,९४,०००/- चे दागिणे चोरुन नेले व त्यातील काही दागिणे आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ ला दिले व आरोपी क्र.२ ने ते चोरीचे दागिणे असल्याचे माहिती असतांनाही स्विकारले व चोरीस गेलेले काही दागिणे आरोपी क्र.१, २ व ३ यांनी त्याचे निवेदनाप्रमाणे काढून दिले व पोलिसांनी ते जप्त केल्याचे स्पष्ट होते. वरील विवेचनावरुन आरोपीविरुध्दचे दोषारोप सरकारपक्षाने संशयापलीकडे सिध्द केले आहेत, हे स्पष्ट होते. सबब, मुद्दा क्र. ०१ ते ०४ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदविण्यात आहे.

**<u>मुद्दा क्र.५ बाबत</u>**

६७. मुद्दा क्र. १ ते ४ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने आरोपी क्र.१ व ३ यांनी भारतीय दंड विधान कलम ३८०, ४५४, ४५७ सह कलम ३४ अन्वये व आरोपी क्र.२ यांनी भा.द.वि.कलम ४११ अन्वये गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली असल्यामुळे आरोपी क्र.१ ते ३ यांना दोषी ठरविण्यात येते. आरोपीविरुध्द उपरोक्त गुन्हा अभियोगपक्षाने शाबित केलेला असल्याने, आरोपींस सदर गुन्हयाच्या शिक्षेबाबत त्यांची बाजू मांडण्यासाठी मी या ठिकाणी क्षणभर थांबत आहे.

P S BHOSALE　Digitally signed by P S BHOSALE Date: 2025.07.22 17:48:01 +0530

ठिकाणः- कराड.
दिनांक :- २२/०७/२०२५　　(श्रीमती पी. एस. भोसले)
२रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी 'क' स्तर, <u>कराड</u>.

६८. आरोपींना शिक्षेच्या मुद्दयावर ऐकले. आरोपी क्र.१ ते ३ तर्फे वकिल श्री.ए.एस.साठे यांनी असा युक्तिवाद केला की, आरोपी हे मागील एक वर्षापासून तुरुंगात आहेत. आरोपी हे घरातील कर्ता पुरुष असुन, त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे. त्याची आर्थीक परिस्थिती गरीबीची आहे. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करुन आरोपींविरुध्द सिध्द झालेल्या गुन्हयातील शिक्षेचा विचार करुन, आरोपींनी तुरुंगा मध्ये काढलेल्या कालावधीपुरती शिक्षा करणेत यावी.

६९. याऊलट अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.वाय.पाटील यांनी असा युक्तिवाद केला की, सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असून, आरोपींनी फिर्यादीच्या घराचा दरवाजा तसेच खिडकीचे गज तोडून घरातील किंमती मुद्देमाल सोने, चांदी व हि–याचे दागिणे चोरुन नेलेले आहेत. म्हणुन आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती केली.

७०. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. सदरचा गुन्हा आरोपींनी भा.द.वि.कलम ३८०, ४५४, ४५७ व ४११ सह कलम ३४ अन्वये केलेला असुन, आरोपींनी फिर्यादी हे त्यांचे घरी नसतांना त्यांच्या घरातील सोन्या–चांदीचे तसेच हि–याचे दागिणे व कागदपत्र चोरुन नेलेले आहेत. त्यामुळे गुन्हयाचे स्वरुप व गंभीरता, चोरीस गेलेला मुद्देमाल व त्याचे मुल्य विचारात घेता, आरोपीला दया दाखवून माफक शिक्षा दिल्यास अथवा अपराधी परिविक्षा अधिनियमाप्रमाणे सोडल्यास समाजात चुकीचा संदेश जाईल. म्हणून या प्रवृत्तीला वेळीच चाप बसणे गरजेचे आहे. त्यासाठी आरोपींना सश्रम कारावासासह द्रव्यदंडाची शिक्षा देणे उचित राहील. सबब, या सर्व बाबी विचारात घेता, मुद्दा क्र. ०५ व मुद्देमालासंबंधी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी क्रं. १ – रमेश महादेव कुंभार व आरोपी क्रं. ३ – रफिक मेहबुब शेख यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(२) अन्वये भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३८०, ४५४, व ४५७ सह कलम ३४ अन्वये अपराधाकरीता दोषी धरण्यात येते.

२) आरोपी क्रं. २ – निलेश शामराव गाढवे यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(२) अन्वये भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४११ अन्वये अपराधाकरीता दोषी धरण्यात येते.

३) आरोपी क्रं. १ – रमेश महादेव कुंभार यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३८० या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

४) आरोपी क्रं. ३ – रफिक मेहबुब शेख यांना भारतीय दंड विधान १८६० चे चे कलम ३८० या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

५) आरोपी क्रं. १ – रमेश महादेव कुंभार यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४५४ या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

६) आरोपी क्रं. ३ – रफिक मेहबुब शेख यांना भारतीय दंड विधान १८६० चे चे कलम ४५४ या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

७) आरोपी क्रं. १ – रमेश महादेव कुंभार यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४५७ या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

८) आरोपी क्रं. ३ – रफिक मेहबुब शेख यांना भारतीय दंड विधान १८६० चे चे कलम ४५७ या अपराधासाठी २ वर्षे सश्रम कारावास व रक्कम रुपये ५,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १ महिना सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

९) आरोपी क्रं. २ – निलेश शामराव गाढवे यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४११ या अपराधासाठी १ वर्षे ६ महिने सश्रम कारावास व रक्कम रुपये २,०००/– द्रव्यदंड व द्रव्यदंड न भरलेस १५ दिवस सश्रम कारावास, अशी शिक्षा भोगणेची आहे.

१०) आरोपी क्र.१ व ३ यांनी वर नमुद केलेल्या शिक्षा एकत्रितरित्या भोगावयाच्या आहेत.

११) **जप्त मुद्देमाल –** सोने एम.आर.क्र.१३४/२४, एम.आर.क्र.१३५/२४, एम.आर.क्र.७६/२४, एम.आर.क्र.२४४/२४ व एम.आर.क्र.२४५/२४ हे फिर्यादीस तसेच जप्त गाडी एम.आर.क्र.१३७/२४ हे रेश्मा रमेश कुंभार यांना योग्य त्या कायदेशीर कारवाईने परत करण्यात आले असुन, ते त्यांचेच ताब्यात ठेवणेत यावे. परंतु, आरोपी क्र.४ बाबत सदरचा खटला प्रलंबीत ठेवला असल्यामुळे जेव्हा न्यायालय आदेश देईल तेव्हा ते न्यायालयात हजर करावयाचे आहे.

**जप्त मुद्देमाल –** एम.आर.क्र.१६१/२४ दोन जप्त मोबाईल हे आरोपी क्र.४ विरुध्द खटला प्रलंबीत असल्यामुळे सदरचा मुद्देमाल आरोपी क्र.४ चे सुनावणीपर्यंत राखुन ठेवणेत येत आहे.

१२) आरोपी क्र.४ हा गुन्हा घडल्यापासून फरारी आहे. त्यामुळे सदरचा खटला आरोपी क्र.४ विरुध्द प्रलंबीत ठेवण्यात येत आहे. आरोपी क्र.४ जेव्हा मिळुन येईल तेव्हा त्याचेविरुध्द खटला पुढे चालविणेत येईल. सदरचे प्रकरण आरोपी क्र.४ यांच्या बाबत प्रलंबीत ठेवले असल्यामुळे सदर प्रकरणातील कागदपत्र सांभाळून ठेवणेत येत आहेत.

१३) आरोपी क्रं. १ – रमेश महादेव कुंभार, आरोपी क्र.क्र.२ – निलेश शामराव गाढवे हे दि.०६/०४/२०२४ पासून व आरोपी क्र. ३ – रफिक मेहबुब शेख हा दि.२१/०६/२०२४ पासून तुरुंगात असल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ अन्वये सदर कालावधी हा आरोपींना दिलेल्या शिक्षेमधून वगळण्यात यावा.

१४) सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपींना विनामुल्य देणेत यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)**

P S BHOSALE
Digitally signed by P S BHOSALE
Date: 2025.07.22 17:48:13 +0530

दिनांक :– २२/०७/२०२५

(श्रीमती पी. एस. भोसले)
२रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी 'क' स्तर,
कराड.